दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–१४१ मंगळवार, दि.१६ सप्टेंबर २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

संपादकीय

महाराष्ट्राला शैक्षणिक गळती शोभणार नाही !

आठवीनंतर नववी आणि दहावीला न बसता शिक्षणालाच रामराम ठोकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण तब्बल साडेअकरा टक्के असल्यामुळे महाराष्ट्रासारख्या राज्यात शिक्षणतज्ज्ञांना आणि राज्य सरकारलाही गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. गेल्या शैक्षणिक वर्षांमध्ये नववी आणि दहावीच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी सुमारे १२.६% विद्यार्थी आणि १०.३ टक्के विद्यार्थिनींनी आपले शिक्षण अर्धवट सोडल्याची धक्कादायक माहिती केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नुकत्याच जाहीर केलेल्या यू-डायस प्लस या अहवालात देण्यात आली आहे.

आचार्य देवव्रत यांनी महाराष्ट्राच्या राज्यपालपदाची घेतली शपथ

मुंबई: राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची देशाच्या उपराष्ट्रपतिपदी निवड झाल्याने राज्याच्या राज्यपालपदाचा कार्यभार गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. त्यानुसार देवव्रत यांनी सोमवपारी (दि.१५) पदभार स्वीकारला असून, राजभवनात त्यांनी शपथ घेतली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. रविवारी दुपारी तेजस एक्स्प्रेसने देवव्रत हे पत्नी दर्शना देवी यांच्यासह मुंबईत दाखल झाले. रेल्वे स्थानकावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी मंत्री मंगलप्रभात लोढा, राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

थोडक्यात...

सरसकट हेक्टरी ५० हजारांची मदत द्यावी – काँग्रेस

मुंबई : राज्यात परतीच्या पावसाने धुमाकुळ घातला असून, शेतकरी प्रचंड हवालदिल झाला आहे. राज्यभरातील जवळपास सर्वच भागातील पिके वाया गेली असून, हा खरीप हंगामच वाया गेला आहे. शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. त्याच्याकडे पाहण्यास महायुती सरकारला वेळ नाही. शेतकरी एवढ्या प्रचंड संकटात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा त्यांच्या मंत्रिमंडळातील एकही मंत्री मदत देण्याबाबत तोंडातून चकार शब्द काढत नाही. सरकारने या संकटाचे गांभीर्य लक्षात घेऊन शेतकऱ्याला सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये तातडीची मदत द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

अनियमितता आढळल्यास एसआयआर रद्द करू

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने बिहारमधील एसआयआर (मतदार पडताळणी) विरोधात दाखल केलेल्या याचिकांवर सोमवार दि. १५ सप्टेंबर रोजी सुनावणी केली. या दरम्यान, याचिकाकर्त्यांनी सांगितले की निवडणूक आयोग प्रक्रिया पाळत नाही. नियमांकडे दुर्लक्ष केले जात आहे. निवडणूक आयोगाला त्यांच्या जबाबदाऱ्या माहित आहेत असे आम्ही गृहीत धरू. जर काही अनियमितता आढळली तर आम्ही त्याची चौकशी करू. बिहारमध्ये एसआयआर दरम्यान निवडणूक आयोगाने स्वीकारलेल्या प्रक्रियेत काही बेकायदेशीरता आढळल्यास, संपूर्ण प्रक्रिया रद्द केली जाऊ शकते. न्यायालयाने स्पष्ट केले की ते बिहार एसआयआरवर तुकडा तुकडा मत देऊ शकत नाही. त्यांचा अंतिम निर्णय केवळ बिहारमध्येच नव्हे तर संपूर्ण भारतात एसआयआरला लागू होईल. या प्रकरणाची पुढील सुनावणी ७ ऑक्टोबर रोजी होईल.

सर्वोच्च न्यायालयाची वनताराला क्लीनचिट

नवी दिल्ली: अंबानी कुटुंबाच्या रिलायन्स फाउंडेशनद्वारे चालवल्या जामनगरमधील वनतारा वन्यजीव बचाव आणि पुनर्वसन केंद्रात प्राण्यांची खरेदी आणि विक्री नियमांच्या चौकटीतच झाली, असे सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी म्हटले. विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) अहवालात कोणतीही अनियमितता आढळली नाही, असे न्यायालयाने म्हटले. न्यायमूर्ती पंकज मित्तल आणि न्यायमूर्ती पी.बी. वरळे यांच्या खंडपीठाने म्हटले की आता हे प्रकरण पुन्हा पुन्हा उपस्थित होऊ दिले जाणार नाही. एका स्वतंत्र समितीने चौकशी केली आहे आणि आम्ही त्यावर अवलंबून राहू. यापूर्वी, २६ ऑगस्ट रोजी, सर्वोच्च न्यायालयाने दोन जनहित याचिकांवर (पीआयएल) एसआयटी स्थापन करण्याचे आदेश दिले होते. कोल्हापूरमधील एका मंदिरातून माधुरी हत्ती वनतारा येथे हलवल्याच्या वादानंतर जुलैमध्ये वकील सीआर जया सुकिन यांनी एक आणि देव शर्मा यांनी दुसरी याचिका दाखल केली होती.

बेरोजगारीचा दर ५.१ टक्का घसरला

मुंबई: ऑगस्ट २०२५ मध्ये भारताचा एकूण बेरोजगारीचा दर ५.१% पर्यंत घसरला आहे. जूनमध्ये हा दर ५.६ टक्के होता, जुलैमध्ये ५.२ टक्क्यांवर, तर आता ऑगस्टमध्ये ५.१ टक्क्यांवर पोहोचला आहे. सांख्यिकी आणि कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालयाने सोमवारी जारी केलेल्या नियतकालिक श्रम बल सर्वेक्षण मध्ये ही माहिती देण्यात आली आहे. सरकारी आकडेवारीनुसार, ऑगस्टमध्ये १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या पुरुषांमधील बेरोजगारीचा दर ५.० टक्क्यांपर्यंत खाली आला आहे, जो एप्रिल २०२५ नंतरचा सर्वात कमी दर आहे. शहरी पुरुषांमधील बेरोजगारीचा दर जुलैमध्ये ६.६ टक्क्यांवरून ऑगस्टमध्ये ५.९ टक्क्यांवर आला, तर ग्रामीण पुरुषांमधील बेरोजगारी ४.५ टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. ग्रामीण भागातील बेरोजगारीचा दर सलग तीन महिन्यांपासून घटत आहे. तो मेमध्ये ५.१ टक्क्यांवरून ऑगस्टमध्ये ४.३ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. एकूण ग्रामीण आणि शहरी बेरोजगारीचा दर ५.१ टक्के राहिला.

दोन महिन्यांत २ हजार शेतकरी आत्महत्या सरकारला मात्र गांभीर्य नाही-शरद पवार

नाशिक । प्रतिनिधी

राज्यात गेल्या दोन महिन्यांत २ हजारहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकरी आत्महत्या करत आहेत. पण आजचे राज्यकर्ते त्यांच्याकडे ढुंकून बघायला तयार नाहीत. यामुळे आता आम्हाला बघ्याची भूमिका घेता येणार नाही, अशा शब्दांत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी राज्य सरकारवर टीका केली.

नाशिकमध्ये सोमवारी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने शेतकरी प्रश्नी जनआक्रोश मोर्चा काढला. त्यानंतर जाहीर सभा घेतली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, पक्षाचे विधिमंडळ पक्षनेते जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते. शरद पवार म्हणाले, शेतकरी जीव का देतोय? हे समजून घेतले पाहिजे. कर्जबाजारीपणा हे त्यामागील कारण आहे. महाराष्ट्रातील जवळपास सर्व जिल्ह्यांमध्ये यंदाच्या वर्षी अतिवृष्टी झाली. यामुळे शेतकरी अस्वस्थ आहे. संकटावर मार्ग काढायचा असतो. ही जबाबदारी राज्य आणि केंद्र सरकारची असते, असे शरद पवार यांनी नमूद केले. मी कृषी खात्याचा मंत्री होतो. एके दिवशी यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्याने आत्महत्या केली. मी अस्वस्थ झालो. दुसऱ्या दिवशी मी त्यावेळी पंतप्रधान मोहन सिंग यांना विनंती केली की शेतकरी जीव देतोय हे चांगले नाही. तो का जीव देतोय? हे समजून घेतले पाहिजे. संबंधित शेतकरी कुटुंबाची भेट घेण्यासाठी ते लगेच तयार झाले.

▶▶ पान २ वर

बंजारा समाजाचा विराट मोर्चा

एसटी प्रवर्गातून आरक्षण मागणी; जिल्हाधिकारी कार्यालयावर जनसागर

बीड । प्रतिनिधी

बंजारा समाज हक्काचा वाटा मागतोय, आम्ही भिक मागत नाहीत, आम्ही कोणाच्या ताटातलं मागत नाहीत किंवा कोणाचे खरकटे सुध्दा मागत नाहीत. कारण बंजारा समाज हा स्वाभिमानी समाज आहे. बंजारा समाज एवढा लाचार सुध्दा नाही की कोणाचं खरकटं मागेल अशा शब्दात भावना व्यक्त करत बंजारा समाजाला एसटीचे आरक्षण लागू करा, १७ सप्टेंबर पुर्वी एसटी आरक्षणाची घोषणा करा अन्यथा मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन काळा दिन म्हणून साजरा केला जाईल असा इशारा बंजारा समाज बांधवांनी आजच्या विराट मोर्चातून राज्य सरकारला दिला आहे.

बीडमध्ये सकल बंजारा समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी सोमवारी दुपारी एक नंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सुरू झालेला मोर्चा माळीवेस, सुभाष रोड, आण्णाभाऊ साठे चौक, बसस्टँड

▶▶ पान २ वर

रस्त्यावरची अन कायदेशीर लढाईत मी सोबत–आ.धनंजय मुंडे

अनेक वर्षापासूनच्या असलेल्या मागणीला वाचा फुटली आहे. तर राज्यात असलेल्या बंजारा बांधवांना एसी आणि एसटीचा आरक्षण मग आमच्या महाराष्ट्रातीलच बंजारा बांधवांनी काय पाप केले. सरकारने एका समाजाला हैदराबाद गॅझेट लागू केले तोच गॅझेट बंजारा समाजाला लागू करून एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे. माझे नशीब नेहमीच बलत तर आहे मी आज सरकारच्या मंत्रीपदावर नाही म्हणून मला समाजाच्या न्याय मागणीला रस्त्यावरची लढाई लढताना येता आले. समाजाच्या रस्त्यावरच्या आणि कायदेशीर लढाईत मी सोबत राहणार असून सरकारला आरक्षण देण्यासाठी मागणी करणार असे मत आ. धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले.

वक्फ सुधारणा कायद्याला स्थगिती नाही-न्यायालय

दिल्ली । वृतसंस्था

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी वक्फ सुधारणा कायदा, २०२५ वर मोठा निकाल दिला. कायद्याला स्थगिती देण्याच्या मागणीवर विचार करण्यास न्यायालयाने नकार दिला आहे. या कायद्याला केवळ दुर्मिळातील दुर्मिळ प्रकरणांमध्येच स्थगिती दिली जाऊ शकते. आम्ही असे गृहीत धरले आहे की, गृहीतक नेहमीच कायद्याच्या घटनात्मकतेच्या बाजूने असते, असे स्पष्ट करत या कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर अंतिम निर्णय

▶▶ पान २ वर

बीडच्या रेल्वे कामाची गती वाढणार!

उद्याच्या रेल्वेसेवा शुभारंभाच्या पार्श्वभुमीवर राज्य शासनाकडून १५० कोटीचा निधी वितरीत

मुंबई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या विकासात गेम चेंजर ठरणाऱ्या 'अहिल्यानगर–बीड–परळी वैजनाथ' या महत्त्वाकांक्षी नवीन ब्रॉड गेज रेल्वेमार्ग प्रकल्पाला गती देण्यासाठी राज्य शासनाने आजवर तब्बल २ हजार ९१ कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्यात नव्याने १५० कोटींची भर घालून तो निधी सोमवारी वितरीत करण्यात आला आहे. या निधीच्या वितरणामुळे या रेल्वे प्रकल्पाच्या कामाला अधिक गती मिळणार असून, बीडकरांना उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची अनोखी भेट दिली आहे.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुहूर्तावर, म्हणजेच दि. १७ सप्टेंबर रोजी 'बीड–अहिल्यानगर' या टप्प्यावरील रेल्वेसेवेचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या ऐतिहासिक घटनेमुळे बीड जिल्ह्यातील लाखो नागरिकांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरणार आहे. 'अहिल्यानगर–बीड–परळी वैजनाथ' या प्रकल्पासाठी

▶▶ पान २ वर

मराठवाड्यात पावसाचे थैमान!

दोन महिलांचा वाहत्या पाण्यात बुडून मृत्यू, मालमत्तेचे मोठे नुकसान

संभाजीनगर । प्रतिनिधी

मराठवाड्यातील काही भागात सोमवारी सलग दुसऱ्या दिवशी मुसळधार पाऊस पडल्याने नद्या दुथडी भरून वाहत आहेत. यामुळे अनेक भागात पाणी शिरले आहे. आठ जिल्ह्यांचा समावेश असलेल्या मराठवाडा प्रदेशात या वर्षी जूनपासून सरासरी ६७६ मिमी पाऊस पडला आहे, जो सरासरी पावसापेक्षा ७९ मिमी जास्त आहे.

▶▶ पान २ वर

आष्टीमध्ये लष्कराला पाचारण

बीड जिल्ह्यातील पावसाने वेढलेल्या पूरग्रस्त भागात अडकलेल्या अकरा जणांना सोमवारी आयएएफच्या हेलिकॉप्टरने वाचवण्यात आले, तर पूर मदत कार्यासाठी आष्टी तालुक्यात लष्कराचे जवान तैनात करण्यात आले आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. पावसामुळे सखल भागात पाणी साचले असून, विविध गावांमध्ये ५१ जणांना बाहेर काढण्याच्या प्रतीक्षेत ठेवण्यात आले आहे आणि एनडीआरएफची टीम तैनात करण्यात आली आहे. आष्टी तालुक्यातील कडा गावाजवळील शेरी खुर्द गावात एकाच कुटुंबातील अकरा जण अडकले होते. त्यांना सोमवारी नाशिकहून बोलावलेल्या हवाई दलाच्या हेलिकॉप्टरने बाहेर काढण्यात आले, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

पंतप्रधान परराष्ट्र धोरण फक्त अंबानीसाठी राबवतात–आंबेडकर

मुंबई । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आर्थिक, परराष्ट्र धोरण पूर्णतः अपयशी ठरले आहे. मोदी यांच्या स्वत:च्या इगोमुळे देशाचे आर्थिक, परराष्ट्र धोरण याला धक्का बसला आहे. मोदी देशाचे परराष्ट्र धोरण फक्त अंबानीसाठी राबवताहेत. भारत जगभरातून जे ऑईल घेऊन इतर देशांना विकतोय त्याचा ८० टक्के नफा जवळपास ४४ हजार कोटींचा नफा (प्रॉफीट) हा फक्त अंबानीला होतोय. हे भारताच्या सामाजिक व आर्थिक उद्दिष्टांविरोधात 'एनार्कीचा

▶▶ पान २ वर

तुरुंगाबाहेर येताच गुंडासाठी बीडमध्ये फटाक्याचा पाऊस

बीड । प्रतिनिधी

गुन्हेगारीच्या घटनांमुळे बीड जिल्हा गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत आहे. अशातच आता एका गुंडाचे तुरुंगातून सुटल्यानंतर फटाक्यांची आतषबाजी करत स्वागत केल्याचा प्रकार समोर आला आहे. बीड शहरातील सराईत गुन्हेगार शेख नवीद शेख चाँद या गुंडावर बीड पोलिसांनी एमपीडीएअंतर्गत ३ जून २०२५ रोजी कारवाई केली होती. त्याच्यावर पेठ बीड पोलिस ठाण्यात अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. मात्र आता तो जामीनावर बाहेर आला आहे.

बीड पोलिसांनी शेख नवीद शेख चाँदला अटक केली होती. या कारवाईनंतर त्याने

▶▶ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१५ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू: ४६.५० क्विंटल

किमान	कमाल	सरासरी
२,५००	३,०००	२,७१६

ज्वारी/हायब्रिड : ३०.०० क्विंटल

२,१०१	२,५९०	२,३३०

मका/लोकल:५.०० क्विंटल

२,१७५	२,१७५	२,१७५

तूर : ०.५० क्विंटल

६,१००	६,१००	६,१००

उडीद : ३२.५० क्विंटल

४,४००	५,८५९	५,३४९

बाजरी: ४५.५० क्विंटल

२,२००	२,८३५	२,६६१

मुग:३.०० क्विंटल

४,८००	५,६९०	५,२४५

सोयाबीन: ७.५० क्विंटल

३,७००	३,८००	३,७५०

हरभरा: ५.५० क्विंटल

४,५७०	५,४००	४,९८५

यांची हयात गेली अन् रेल्वे आली! त्यांचा संघर्ष कामी आला

● सुभाष चौरे ●

अहिल्यानगर –बीड –परळी या २६१.२५ किलोमीटर मार्गाच्या रेल्वे प्रकल्पासाठी बीड जिल्ह्यामध्ये मोठी आंदोलने झाली. अनेकांनी या मार्गासाठी पाठपुरावा केला परंतु आज या मार्गासाठी प्रयत्न करणारे, पाठपुरावा करणारे अनेकजण हयात नाहीत. त्यांच्या हयातीत रेल्वे आली नाही, मात्र त्यांनी केलेल्या परिश्रमाचे हे फळ म्हणावे लागेल. १७ सप्टेंबर रोजी डेमो रेल्वे सुरू होत आहे हा बीडकरांसाठी आनंदाचा दिवस असला तरी त्यासाठी झिजणाऱ्यांची आठवण मात्र कायम स्मरणात राहील.

प्रथम १९८३- ८५ दरम्यान

अहिल्यानगर –बीड –परळी या रेल्वे मार्गाची मागणी सुरू झाली. प्रारंभी स्व. द्वारकादास मंत्री, काँग्रेड अत्तर बाबर यांनी या चळवळीला सुरुवात केली आणि ही चळवळ जिल्हाभर पसरल्यानंतर पुढे स्वतः स्व. खा.केसर काकू यांनी हा प्रश्न लावून धरला. काकूं बरोबरच स्व. गोपीनाथ मुंडे, स्व. विलासराव देशमुख, विमलताई मुंदडा, नामदेवराव क्षीरसागर, मदनालाल सारडा, बन्सीधरराव जाधव, स्व.अमोल गलधर यांच्यासह अनेकांचे मोठे योगदान या रेल्वे लढ्याला लागले. या सर्व लोकांची आंदोलनात हयात

▶▶ पान २ वर

समितीची होत असे चेष्टा

स्व.सै.रेल्वे मागणी आंदोलन समितीच्या सदस्य असलेले लाहोटी, सारडा क्षीरसागर, लोळगे, वाकुडे, जाधव, बुध्ददेव, लईक, नवीदजमा, डाके, या सह अन्य सदस्य जेव्हा मंत्री लोकप्रतिनिधी जिल्ह्याच्या दौऱ्यावर असत तेव्हा हे सर्व रेल्वे संदर्भात निवेदन देण्यास जात असत तेव्हा अनेक जण त्यांच्याकडे पाहुन आली बघा रेल्वे असे म्हणत हिनवत असत. मात्र आता प्रत्येक्षात रेल्वे येत आहे तेव्हा आता तीच मंडळी या रेल्वेचा आनंद घेतांना दिसत आहेत.

अग्रलेख

महाराष्ट्राला शैक्षणिक गळती शोभणार नाही !

आठवीनंतर नववी आणि दहावीला न बसता शिक्षणालाच रामराम ठोकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण तब्बल साडेअकरा टक्के असल्यामुळे महाराष्ट्रासारख्या राज्यात शिक्षणतज्ज्ञांना आणि राज्य सरकारलाही गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. गेल्या शैक्षणिक वर्षांमध्ये नववी आणि दहावीच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी सुमारे १२.६% विद्यार्थी आणि १०.३ टक्के विद्यार्थिनींनी आपले शिक्षण अर्धवट सोडल्याची धक्कादायक माहिती केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नुकत्याच जाहीर केलेल्या यू-डायस प्लस या अहवालात देण्यात आली आहे. देशातील शैक्षणिकदृष्ट्या आणि औद्योगिकदृष्ट्या सर्वात प्रगत राज्य मानल्या गेलेल्या महाराष्ट्र राज्याची शैक्षणिक परिस्थिती विदारक असल्याचे समोर येत असल्याने हा मोठा धक्का मानला जात आहे.

एकीकडे केंद्रीय पातळीवर आणि राज्याच्या पातळीवरही शैक्षणिक स्तर सुधारण्यासाठी विविध प्रकारच्या योजनांचा भडिमार होत असताना अशा प्रकारे नववी आणि दहावीमध्येच विद्यार्थी शिक्षण सोडत असतील तर कोठेतरी काही चुकते आहे हे समजून घ्यावे लागणार आहे. शिक्षण हक्क कायदा, समग्र शिक्षण अभियान, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अशा अनेक प्रकारच्या योजना शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी कार्यरत असल्या तरी त्या पुरेशा पडत नाहीत किंवा अंमलबजावणीत काहीतरी गडबड आहे असेच यू-डायसच्या अहवालावरून सिद्ध होत आहे. तब्बल आठ वर्षे शिक्षण घेतल्यानंतर ११% पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना नववी किंवा दहावीमध्ये शिक्षण का सोडावेसे वाटते याची कारणेही शोधणे गरजेचे आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे राज्यात इयत्ता आठवीपर्यंत परीक्षा पद्धती अस्तित्वात नसल्याने म्हणजेच परीक्षा घेऊन त्या मूल्यमापनाच्या आधारे विद्यार्थ्यांना वरच्या वर्गात पाठवण्याची पद्धत अस्तित्वात नसल्याने नववी, दहावीत गेल्यानंतर ह्या परीक्षा पद्धतीचा बाऊ विद्यार्थ्यांना वाटत असावा. आठवीपर्यंत आपण सहजपणे एक एक पायरी चढत वर आलो आहोत पण नववीमध्ये किंवा दहावीमध्ये परीक्षा पास झाल्याशिवाय पुढे जाता येणार नाही ही भीती विद्यार्थ्यांच्या मनात तयार होत असल्यामुळे अनेकांनी शिक्षण अर्धवट सोडले असावे, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे विद्यार्थ्यांना आपल्या गावाजवळच शाळेची सोय उपलब्ध व्हायला हवी, असे जरी सांगण्यात येत असले तरी राज्यात तशी परिस्थिती नाही.

अनेक ठिकाणी माध्यमिक शिक्षणासाठी आपल्या गावापासून लांब शिक्षणासाठी जावे लागते. दुर्गम ठिकाणी असलेल्या प्रदेशांमध्ये नद्या ओलांडून आणि डोंगर-दऱ्या उतरून विद्यार्थ्यांना कसेतरी शाळेपर्यंत पोहोचावे लागते. दररोज अशा प्रकारची कसरत करणे अवघड असल्यामुळेही कदाचित अनेक विद्यार्थ्यांना शाळेत जावेसे वाटत नसावे. आठवीपर्यंत इतर सर्व विद्यार्थ्यांप्रमाणे मूल्यमापन होणार्या विद्यार्थ्यांना नववीमध्ये जेव्हा एखाद्या परीक्षेत नापास व्हावे लागते तेव्हा त्यांच्या मनामध्ये एखादा गंड तयार होऊन शिक्षणाबद्दल घृणा आणि भीती निर्माण होऊ शकते. याचा एकत्रित परिणाम म्हणूनच नववी आणि दहावीमध्ये विद्यार्थ्यांनी शाळा सोडण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये उच्च शिक्षणाच्या अनेक सोयी उपलब्ध होत असतानाच माध्यमिक पातळीवर अशा प्रकारे शैक्षणिक गळती वाढत असेल तर त्या उच्च शिक्षणाचा नक्की फायदा कोणाला होणार आहे याचाही शोध घेण्याची गरज आहे. नववी किंवा दहावीमध्ये अशाप्रकारे शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांना नंतर अंगमेहनत करूनच रोजगार मिळवावा लागतो. नंतरच्या आयुष्यामध्ये आर्थिक विकास होण्याची त्यांची शक्यता खूपच कमी होऊन जाते. ही परिस्थिती लक्षात घेऊनच आता सरकारला यू-डायसच्या अहवालात ज्या गोष्टी सूचित करण्यात आल्या आहेत त्याची गंभीर दखल घेऊन शिक्षणक्षेत्राला शिस्त लावण्याबाबत काही ठोस निर्णय घ्यावे लागणार आहेत. अजूनही ग्रामीण भागामध्ये खासगी शिक्षण संस्थांपेक्षाही जिल्हा परिषदेच्या शाळा आणि काही प्रमाणात स्थानिक संस्थांच्या शाळांच्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. त्या सोयी पुरेशा नसतात. विद्यार्थ्यांना आपल्या घराजवळ शिक्षण उपलब्ध करून देण्याचा आदर्श विचार मांडण्यात आला असला तरी तो अद्याप प्रत्यक्षात आलेला नाही. पण त्या दिशेने ठोस प्रयत्न मात्र करावे लागणार आहेत. देशात अनेक ठिकाणी दहावीनंतरच्या शैक्षणिक स्तरासाठी मुक्त विद्यापीठासारखे प्रयोग उपलब्ध आहेत.

याच प्रकारचे प्रयोग नववी, दहावीत शाळा सोडण्याची मानसिकता असणार्या विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात आले, तर त्यांना घरबसल्या शिक्षण घेता येईल. महाराष्ट्राचे शिक्षण खाते, राज्यातील सर्व शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक संघटना यांनी एकत्रित विचार करून या समस्येवर तोडगा काढायला हवा. गेल्या शैक्षणिक वर्षांमध्ये साडेअकरा टक्केपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नववी, दहावीमध्ये शिक्षण सोडले आहे असेच नाही, तर गेल्या काही वर्षांमध्ये हे प्रमाण सातत्याने वाढत चालले आहे हे जास्त महत्त्वाचे आणि गंभीर आहे. शैक्षणिक गळतीची ही गंभीर समस्या संपवायची असेल, तर राज्य सरकारला आता प्राधान्याने उपाययोजना करावी लागणार आहे.

पान ६ वरून...

नुकसानग्रस्त भागाची

अधिकाऱ्यांना दिले. यावेळी खुर्शीद आलम यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून झालेल्या नुकसानीची योग्य भरपाई द्यावी, तसेच तेलगाव रोड ते कंकालेश्वर मंदिर या दरम्यान नाल्यालगत संरक्षण भिंत उभारावी अशी मागणी केली. या पाहणीदरम्यान जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके, मुख्याधिकारी शैलेश फडसे, नायब तहसीलदार सुहास हजारे यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते, यानंतर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी चांदणी चौकास भेट देऊन धोकादायक ठिकाणी थांबून पुराची पाहणी करणाऱ्या गर्दी करणाऱ्यांना सूचना केल्या, पोलीस प्रशासनाला सूचना केल्या . पुराच्या ठिकाणी कोणीही थांबू नये अशी गर्दी करणाऱ्यांना तंबी दिली,

---

दिंद्रुडच्या सरस्वती

परिसरासह डोंगराळ भागात ढगफुटी सदृश पाऊस पडल्यामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले. तर डोंगराळ भागातील जोरदार पावसामुळे त्या (दक्षिण) दिशेने उत्तरेकडे वाहणारी दिंद्रुड येथील सरस्वती नदीला पूर आला. त्यामुळे या नदीवरील बंधारे व इतर छोट्या मोठ्या नद्या वरील देखील सर्व बंधारे तुडुंब भरून वाहत आहेत. दररोजच्या पडत असलेल्या रिमझिम पावसाने शेतीतील कामे ठप्प झाली आहेत. कापूस, सोयाबीन अधिक पिकांची फवारणी, खतपेरणी तोंडावर आली असून, रिमझिम व मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांची शेतीतील सर्व कामे सध्या तरी खोळंबली आहेत. त्यामुळे हा पाऊस शेतातील उभ्या धानाची नासाडी करतो कि काय ? अशी चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

नागरिकांनी सतर्क राहण्याचे

करण्यात आले आहेत. याच पार्श्वभूमीवर माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी जिल्ह्यातील नागरिकांना सतर्क राहून काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. धनंजय मुंडे यांनी आपण सातत्याने प्रशासनाच्या संपर्कात असून, जिल्हा प्रशासन अलर्ट मोडवर असल्याचे म्हटले आहे. वीज प्रवाह, तारा, खांब आदी ठिकाणांपासून दूर राहावे, वाहत्या पाण्यात वाहने घालू नयेत किंवा पुलावरून पाणी वाहत असल्यास त्यातून पादचारी किंवा वाहने घालू नयेत, धोकादायक किंवा पडझड झालेल्या घरापासून सुरक्षित स्थळी जावे, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी जिल्ह्यातील नागरिकांना केले आहे. दरम्यान सततच्या पावसाने जिल्ह्यातील जवळपास सर्वच लहान मोठ्या नद्यांना पूर आले असून, अनेक गावांचा संपर्क तुटला आहे तर अनेक ठिकाणी रस्त्यावरील वाहतूक खोळंबली आहे. कोणत्याही आपत्तीच्या परिस्थितीत जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन कक्ष किंवा आपत्ती परिस्थितीत कोणत्याही मदतीसाठी माझ्या कार्यालयास संपर्क साधावा, असेही आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे.

बीएस एन एल सल्लागार समितीचे सदस्य गणेश वरेकर यांनी घेतला आढावा

बीड । प्रतिनिधी

आज बीड. बीएस एन.एल. समितीच्या सल्लागार सदस्यपदी नियुक्ती झाल्यानंतर गणेश वरेकर यांनी बीड जिल्ह्याच्या मुख्य कार्यालयात जाऊन सर्व अधिकारी व कर्मचारी यांची आढावा बैठक घेतली व बी.एस.एन.एल.च्या सर्व कामांचा आढावा घेतला, यावेळी अधिकार्यांनी विविध समस्या गणेश वरेकर यांना सांगितल्या यावेळी बोलताना गणेश वरेकर यांनी सांगितले की, मला सल्लागार समितीचे सदस्य नियुक्त केले आहे आता या खात्याला जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहिल , आपल्या समस्या सोडविण्यासाठी

मी मुंबई असो किंवा दिल्ली असो याठिकाणी स्वतः जाऊन आपल्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करीन यावेळी बी.एस.एन.एल.च्या वतीने गणेश वरेकर यांचा सत्कार करुन सन्मान करण्यात आला.समवेत शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, माजी सरपंच सखाराम तात्या मोहिते, तसेच मनोहर कैवाडे डी.ई.पचिशम बीड,आसाराम सुपेकर डी.ई पुर्व बीड ,देवी सिंग आनारे डी.जी.एम.बीड.,विशाल रामपाल तिवारी जे.टी.ओ.बीड हे अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या दौऱ्यासाठी शिवसेनेची आज बैठक

जालना । प्रतिनिधी

शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे गुरुवारी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर कार्यकर्ता मेळाव्यासाठी येत असून नियोजनासाठी शिवसेनेची महत्त्वपूर्ण बैठक मंगळवारी (ता.१६) सकाळी ११.०० वा.भाग्यनगर परिसरातील आ.अर्जुनराव खोतकर यांच्या संपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी दिली.

आ.अर्जुनराव खोतकर, आणि आ. हिकमत उढाण यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकीस शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यात शिवसेनेचे संघटन बळकत करण्याच्या दृष्टिकोनातून आणि संघटनेला उभारी देण्याकरिता उपमुख्यमंत्री शिंदे यांचा दौरा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. असे सांगून नियोजन बैठकीस जिल्हा परिषद, पंचायत समिती ,बाजार समिती,नगर पालिका, नगर पंचायती, ग्रामपंचायतींचे आजी- माजी पदाधिकारी, सदस्य ,शिवसेना, युवासेना, दलित आघाडी, महिला आघाडी,किसान सेना, अल्पसंख्यांक सेनेचे जिल्हाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहरप्रमुख, शहर संघटक, उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख तसेच अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी व शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, ए. जे. पाटील बोराडे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले ,डॉ. आत्मानंद भक्त यांनी केले आहे.

दिवसा घर फोडी करणारा आरोपी जेरबंद

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्हयात होत असलेल्या चोऱ्या व घरफोड्या सारख्या गुन्हयाला प्रतिबंध होवा व गुन्हे उघडकिस यावे. यासाठी पोलीस अधीक्षक बीड यांनी स्थानिक गुन्हे शाखाचे पोलीस निरीक्षक यांचे अधिपत्याखाली वेगवेगळे तथके तयार करुन गुन्हे उघडकिस आणण्याचे आदेशीत केले होते.

पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड याचे मार्गदर्शनाखाली श्रीराम खटावकर व पथकातील अमंलदार हे पोलीस स्टेशन बर्दापुर गुरंन २०५/२०२५ कलम ३०५ (अ) ३३१ (३) बी.एन.एस. मधील आरोपीचा आष्टी उप विभागात शोध घेत असतांना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, बर्दापुर अमंळनेर पोलीस स्टेशन हद्दीत मार्गील काही दिवसा पुर्वी दिवसा घरफोड्या नोटया जपान काळे रा. वाकी ता. आष्टी याने व त्याचे साथीदारासह केली आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदरची माहिती पोलीस निरीक्षक स्था.गु. शाखा बीड यांना देवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली पथकातील अधिकारी व अमंलदार यांनी सापळा रचुन संशयीत आरोपी नामे नोटया ऊर्फ गोठया ऊर्फ रामदास जपान काळे रा. वाकी ता.आष्टी.जि.बीड यास दिनांक १२.०९.२०२५ रोजी वागजई शिवार वाकी ता. आष्टी जि.बीड येथुन ताब्यात घेवुन त्याचे कडुन १) पोलीस स्टेशन बर्दापुर गुरंन २०५/२०२५ कलम ३०५ (अ) ३३१ (३) बी.एन.एस. २) अमळनेर गुरंन १४८/२०२५ कलम ३०५ (अ) ३३१ (३) बी.एन.एस अन्वये उघड करुन नमुद गुन्हयात चोरी गेलेले सोन्याचे दागिने असा एकुण ९४,०००/-रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर आरोपीकडुन आणखी गुन्हे उघड्किस येण्याची शक्यता आहे. इतर आरोपीतांचा शोध कामी पथक रवाना केले आहेत. पुढील तपास पोलीस स्टेशन बर्दापुर येथील अधीकारी व अमंलदार करीत आहेत. सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, बीड चे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, श्रीराम खटावकर पोलीस उप-निरीक्षक, पोलीस हवालदार अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, बाळु सानप, राहुल शिंदे, आनंद मस्के, अर्जुन यादव, सय्यद अश्फाक, मनोज परजणे, सचिन आंधळे, अश्वीनकुमार सुरवसे यांनी केली आहे.

पान १ वरून...

दोन महिन्यांत २ हजार

दुसऱ्या दिवशी आम्ही दोघेही आलो. यवतमाळला गेलो. शेतकऱ्याच्या घरच्यांची भेट घेतली. तुझ्या माणसाने जीव का दिला? असे विचारल्यावर ती ढसाढसा रडू लागली. तिने सांगितले की कर्ज काढले होते. सोसायटीची नोटीस आली. दुसऱ्या वर्षी खासगी शेतकऱ्याकडे कर्ज काढले. ते फिटले नाही. सावकाराने घरातून भांडी बाहेर काढली आणि अब्रूचा पंचनामा झाला. ते आमच्या माणसाला सहन झाले नाही आणि त्याने जीव दिला. हे कशामुळे झाले तर कर्जबाजारीपणामुळे. याचा अभ्यास केला आणि दहा दिवसांत शेतकरी कर्ज माफ केलें असे शरद पवार म्हणाले. जर हे सरकार शेतकऱ्यांना कर्जमाफी देत नसेल तर हे सरकार आम्ही घालवू; हा फक्त मोर्चा नाही, बळीराजाच्या लढाईची सुरुवात आहे, अशी ठाम भूमिका पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी नाशिक येथे आयोजित शेतकरी आक्रोश मोर्चात मांडली.

वक्फ सुधारणा कायद्याला

होत नाही, तोपर्यंत ही स्थगिती कायम राहील, असा आदेश सरन्यायाधीश बी.आर. गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने दिला. न्यायालये वक्फ म्हणून घोषित केलेल्या मालमत्ता वक्फ यादीतून वगळू शकतात की नाही?. वापराच्या आधारावर (वापरकर्त्याद्वारे वक्फ) किंवा कागदपत्राद्वारे (कागदाद्वारे वक्फ) मालमत्ता वक्फ म्हणून घोषित करता येते का?, न्यायालयाने यापूर्वी एखादी जमीन वक्फ म्हणून घोषित केली असेल, तर सरकार नंतर ती वक्फ यादीतून काढून टाकू शकते की नाही? या मुद्द्यावर निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, ''आम्ही प्रत्येक कलमाला दिलेल्या आव्हानाचा प्रथमदर्शनी विचार केल्यानंतर असे आढळून आले आहे की, संपूर्ण कायद्यावर बंदी घालण्याचा कोणताही मुद्दा नाही.'' सर्वोच्च न्यायालयाने गेल्या पाच वर्षांपासून इस्लामचे पालन करणाऱ्या व्यक्तीच वक्फ तयार करू शकतात या तरतुदीला स्थगिती दिली आहे. न्यायालयाने म्हटले आहे की एखादी व्यक्ती इस्लामचा अनुयायी आहे की नाही हे ठरवण्यासाठी नियम तयार होईपर्यंत ही तरतूद निलंबित राहील. वक्फ तयार करण्यासाठी व्यक्तीला पाच वर्षांसाठी इस्लामचा अनुयायी असणे आवश्यक होते. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, एखादी व्यक्ती इस्लामचा अनुयायी आहे की नाही, हे ठरवण्यासाठी नियम बनेपर्यंत ही तरतूद स्थगित राहील. जिल्हाधिकाऱ्यांना वक्फ म्हणून घोषित केलेली मालमत्ता सरकारी आहे की नाही हे ठरवण्याचा अधिकार मिळाला होता. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, जिल्हाधिकाऱ्यांना नागरिकांच्या वैयक्तिक हक्कांचा न्याय करण्याची परवानगी देता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने असेही स्पष्ट केले आहे की, वक्फ बोर्डात तीनपेक्षा जास्त गैर-मुस्लिम सदस्यांचा समावेश असू नये.

बंजारा समाजाचा

समोरून छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चामध्ये बंजारा समाज पारंपारिक वेषभुशेत सहभागी झाला होता. एकच मिशन एसटी आरक्षण अशा घोषणांचे फलक हाती घेतलेल्या समाज बांधवांनी एसटी आरक्षणाची आग्रही मागणी सरकार आणि प्रशासनासमोर मांडली. या मोर्चाला जिल्हाभरातून बंजारा समाज बांधव प्रचंड मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बंजारा समाजातील युवतींनी मोर्चाला संबोधित केले. यावेळी मोर्चात बंजारा समाजाचे धर्मगुरू बापूसिंग महाराज, आ.धनंजय मुंडे, आ. विजयसिंह पंडित, आ.संदीप क्षीरसागर, मराठा समन्वयक, गंगाधर काळकुटे, योगश क्षीरसागर यांच्यासह समाज बांधव लाखोंच्या संख्येने सहभागी झाला होता.

धर्मगुरू बाबूसिंग महाराज मोर्चा रॅलीत सहभागी

बंजारा समाजाची कशी समजल्या जाणाऱ्या पोहरादेवी देवी येथील महंत बाबूसिंग महाराज बीड येथील एसटी आरक्षण मोर्चा रॅलीत सहभागी झाले होते.

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन काळा दिन साजरा करणार

लाखोंच्या संख्येने दाखल झालेले बंजारा बांधव आपल्या न्याय हक्काची मागणी करत आहे. इंग्रज सरकारांपासून ते निजाम सरकारांपर्यंत सर्वांनीच बंजारा समाजाला आदिवासी म्हणून नोंदी केलेले आहेत. इतर सर्व राज्यात बंजारा समाजाला एसी आणि एसटी मध्ये आरक्षण आहे मग महाराष्ट्रातच व्हीजेएनटी आणले कुठून? असा सवाल उपस्थित करत मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पहिले आरक्षण बाबत हालचाली न केल्यास मराठवाडा मुक्ती संग्राम दिन काळा दिन म्हणून महाराष्ट्रातील बंजारा समाज साजरा करणार असे मोर्चाला संबोधित करणाऱ्या मुलींनी व्यक्त केली.

यांनी दिला मोर्चात जाहीर पाठींबा

मराठा योद्धा मनोज जरांगे यांच्या सूचनेवरून मराठा कृती समितीचा जाहिर पाठींबा, धनगर महासंघ, वंजारी महासंघ, आ.धनंजय मुंडे, आ. विजयसिंह पंडित, आ. संदीप क्षीरसागर यांनी मोर्चात सहभागी होत जाहिरात पाठिंब्याचे पत्र दिले.

विधिमंडळाच्या अधिवेशनात

लक्षवेधी करणार- आ.विजयसिंह पंडित

बंजारा समाजाच्या कुठल्याही लढाईत शिवछत्र परिवार कायम सोबत राहिला आहे. आज लाखोंच्या संख्येने दाखल झालेल्या न्याय हक्काची लढाईत पंडित कुटुंबीय नेहमी सोबत राहिला आहे. यापुढे सोबत राहत फक्त पाठींबाच देत नसून येणाऱ्या काळात विधिमंडळाच्या अधिवेशनात लक्षवेधी मांडणार असल्याचे मत गेवराईचे आ.विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केले.

मराठवाड्यात पावसाचे

धाराशिव जिल्ह्यातील केशेगाव क्षेत्रात सोमवारी २४ तासांत सर्वाधिक १०५ मिमी पाऊस पडला. बीड आणि छत्रपती संभाजीनगरसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे, तर नांदेड, लातूर, धाराशिव, परभणी, हिंगोली आणि जालना येथे सोमवारी पिवळा अलर्ट जारी करण्यात आला आहे. बीड, लातूर, धाराशिव, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांमधील ३२ महसूल क्षेत्रात मुसळधार पाऊस पडला. रविवारी हिंगोली जिल्ह्यातील सात गावांना जोरदार पावसाचा फटका बसला आहे. वसमतच्या गुंडा गावातील दोन महिला वाहत्या पाण्यात बुडाल्या आणि त्यांचा मृत्यू झाला असल्याचे समोर आले आहे.

जलसाठ्यात वाढ

मुसळधार पावसामुळे या भागातील अकरा प्रमुख सिंचन प्रकल्पांमध्ये पाणीसाठा ९४.३६ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. गेल्या वर्षी याच दिवशी ८९.३२ टक्के पाणीसाठा होता. दहा सिंचन प्रकल्पांमधून १.५१ लाख क्युसेक दराने पाणी सोडले जात आहे, ज्यामध्ये नांदेडमधील विष्णुपुरी धरणातून सर्वाधिक ९१,८५४ क्युसेक विसर्ग सुरू आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

बीडच्या रेल्वे कामाची

राज्य शासनाचा एकूण आर्थिक सहभाग ५० टक्के असून, आजवर शासनाने तब्बल २ हजार ९१ कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्यात आता नव्याने १५० कोटींची भर घालण्यात आली आहे. या निधीचे वितरण सोमवारी (दि. १५ सप्टेंबर) करण्यात आले आहे. या निधीचा उपयोग २०२५-२६ या आर्थिक वर्षात रेल्वे विभागाला राज्य सरकारचा हिस्सा देण्यासाठी केला जाणार आहे. 'अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ' हा रेल्वेमार्ग सुमारे २६१ किलोमीटर लांबीचा असून, त्याचा एकूण खर्च ४ हजार ८०५ कोटी रुपये इतका आहे. त्यातील ५० टक्के म्हणजे २ हजार ४०२ कोटी रुपये राज्य शासनाचा वाटा आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या दोन दिवस आधी वितरीत करण्यात आलेल्या या निधीमुळे या प्रकल्पाच्या विकासाला गती येणार आहे. या निधीचा उपयोग २०२५-२६ या आर्थिक वर्षात रेल्वे विभागाला राज्य सरकारचा हिस्सा देण्यासाठी होणार आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्वीकारल्यापासून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्याच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. विमानतळ, रेल्वे व रस्ते विकासाला चालना देण्यासाठी विभागीय, जिल्हास्तरीय तसेच मंत्रालयीन पातळीवर विविध बैठका घेऊन त्यांनी संबंधित विभागांमध्ये प्रभावी समन्वय साधला आहे. या प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम म्हणून 'अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ' या महत्त्वाकांक्षी नवीन ब्रॉड गेज रेल्वेमार्ग प्रकल्पाला गती मिळाली आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुहूर्तावर 'बीड-अहिल्यानगर' या टप्प्यावरील रेल्वे धावणार असून त्याचा थेट फायदा बीड जिल्ह्यातील लाखो नागरिकांना होणार आहे.

विकासाला चालना मिळेल

''अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ रेल्वेमार्ग म्हणजे बीड, अहिल्यानगर आणि परळी वैजनाथ भागातील शेतकरी, विद्यार्थी, उद्योजक, व्यापारी आणि सामान्य जनतेसाठी विकासाला नवी गती देणारा प्रकल्प आहे. या मार्गामुळे जिल्ह्यातील गुंतवणूक वाढेल, रोजगारनिर्मिती होईल आणि वाहतूक सुलभ होईल. बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी हा प्रकल्प गतीमान करण्याचा माझा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. बीड जिल्ह्याचा चेहरा बदलणाऱ्या या प्रकल्पामुळे बीडकरांच्या आयुष्यात नवा विकासप्रवास सुरू होईल'' असा विश्वासही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

तुरुंगाबाहेर येताच गुंडासाठी

हायकोर्टात जामीनासाठी अर्ज केला होता. त्याला दोन दिवसांपूर्वी जामीन मंजूर झाला. यानंतर तो बाहेर आल्यानंतर काल सायंकाळी ५ वाजता बीड शहरातील मोमीनपुरा भागात फटाक्यांची आतिषबाजी करत त्याचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी लहान-लहान मुलांच्या हातांमध्ये स्प्रे देऊन ते उडवायला लावले तर काहींना रंग उधळायला लावला. अशा पद्धतीने एका गुंडाचे भर रस्त्यावर मोठ्या थाटात स्वागत केले जात होते.शेख नवीद शेख चाँदच्या स्वागतामुळे रस्त्यावर वाहतूकीला अडथळा निर्माण झाला होता. याच वाहतूक कोंडीत एक रुग्णवाहिका अडकली होती. या कोंडीतून बाहेर पडण्यासाठी रुग्णवाहिकेला बराच वेळ लागला. बीडच्या जिल्हाधिका-यांनी मनाई आदेश लागू केलेले आहेत त्याचंही या गुंडाने उल्लंघन केले. या संपूर्ण प्रकरणाचा व्हीडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यामुळे आता नागरिकांनी त्याच्यावर कारवाईची मागणी केली आहे. आम्ही सदरील गुंडावर आणि लोकांवर कारवाई करणार असल्याची माहिती पेठ बीड पोलिस स्टेशनचे अधिकारी अशोक मुदीराज यांनी दिली आहे.

पंतप्रधान परराष्ट्र धोरण फक्त

ग्रामर' (अराजकतेचे व्याकरण) आहे, ज्याचा फायदा केवळ अंबानींना होतोय'', अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सोमवारी मुंबईत पत्रकार परिषदेत दिली. प्रकाश आंबेडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आर्थिक, परराष्ट्र धोरणावर तीव्र टीका केली. त्यांनी या धोरणाला ''एनार्कीचा ग्रामर'' (अराजकतेचे व्याकरण) असे संबोधले व सांगितले की, अमेरिका आणि रशियासोबतचे बिघडलेले संबंध भारताच्या सामाजिक व आर्थिक हिताला नुकसान पोहोचवत आहेत. ''भारताची पारंपरिक परराष्ट्र नीती ही अमेरिका व रशिया यांच्यात संतुलन राखण्याची होती. परंतु, मोदी सरकारच्या अपयशी नेतृत्वामुळे आणि आर्थिक परराष्ट्र धोरणामुळे हे संतुलन बिघडले असल्याचे सांगितले. पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर बोलताना म्हणाले की, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लावलेला ५०% टॅरिफ कर भारत-अमेरिका संबंधांना १९७० च्या दशकासारख्या नकारात्मक टप्प्यावर घेऊन गेला आहे. दुसरीकडे, रशियाचे चीनकडे झुकणे आणि व्यापारात युआन चलनाची मागणी भारतासाठी अडचणीचे ठरत आहे. प्रकाश आंबेडकर यांनी आरोप केला की, मोदी यांच्या धोरणाचा सर्वात मोठा फायदा मुकेश अंबानी व त्यांची कंपनी रिलायन्स इंडस्ट्रीजला झाला आहे. २०२२ नंतर भारताने रशियाकडून स्वस्त कच्चे तेल आयात करणे वाढवले. हे तेल थोडे कमी गुणवत्तेचे असले तरी रिलायन्स, नायरा आणि आयओसी सारख्या भारतीय रिफायनऱ्या ते प्रोसेस करू शकतात. पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, एनर्जी अस्पेक्ट्स '' च्या मते, भारताला दर बॅरलमागे सरासरी ११ डॉलरचा नफा मिळाला. २०२३-२४ मध्ये भारताने जवळपास ४४,८९३ कोटींची बचत केली.'' मात्र, ''सामान्य भारतीय नागरिकाला याचा काही फायदा मिळाला का? असा सवाल करत भारतीय तेल कंपन्यांनी घरगुती बाजारात पेट्रोल, डिझेल किंवा केरोसीन स्वस्त केले नाही. रिलायन्स (जामनगर) आणि नायरा एनर्जी (वडीनार, गुजरात) जिच्या ४९.१३% हिस्सा रशियाच्या कडे आहे या दोघांनी मिळून ६०% पेक्षा जास्त रशियन क्रूड तेल आयात केले व परदेशात विकले असा आरोपही यावेळी केला.

यांची हयात गेली अन् रेल्वे आली!

गेली तोपर्यंत मात्र त्यांच्या डोळ्यादेखत रेल्वे आले नाही. आता त्यांच्या जाण्यानंतर बीडला रेल्वे येत आहे. याचे श्रेय नक्कीच त्यांना द्यावेच लागणार आहे. त्यांच्या परिश्रमामुळेच बीडकारांना हा आनंदाचा दिवस पहावा लागत आहे. स्व. केशर काकू यांनी तात्कालीन पंतप्रधान नरसींगराव यांना भेटून या रेल्वे मार्गासाठी आग्रह धरला. १९९५ मध्ये या मार्गाला तांत्रिक मान्यता देण्यात आली. या २६१ किलोमीटर मार्गाला त्यावेळी केवळ ३५३ कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. पुढे हा खर्च ४४५० कोटी पर्यंत गेला. बीडसाठीचा रेल्वे प्रकल्प हा रेल्वेसाठी तोट्याचा होता परंतु जनभावना लक्षात घेता या मार्गाला मान्यता दिली गेली. पुढे हाच मुद्दा स्व. गोपीनाथ मुंडे यांनी लावून धरला मात्र त्याकाळी अमोल गलधर यांनी रस्त्यावरचे तर स्व. नामदेव क्षीरसागर, स्वर्गीय बन्सीधरराव जाधव, बाबा वाकोडे, मदनलाल सारडा अशा या सर

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. १६ सप्टेंबर २०२५

दिंद्रुड: बीड-परळी महामार्गावर रस्त्याचे काम चालू आहे. सोमवारी पहाटे झालेल्या मुसळधार पावसाने ऐन रस्त्यात पाणी साचल्याने ये-जा करणाऱ्यांना त्रास सहन करत पाण्यातून रस्ता काढावा लागला.

थोडक्यात...

लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्याविरुद्ध परळीत गुन्हा दाखल

परळी । प्रतिनिधी

मराठा समाजाबद्दल जाती आधारित वक्तव्यामुळे आमचा अपमान व मानहानी झाली असुन याबाबत गुन्हा दाखल करावा अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली होती. या अनुषंगाने परळी पोलीस ठाण्यात लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे या दोघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार परळीतील मराठा समाज बांधवांनी पोलीस स्टेशनला एका निवेदनाद्वारे लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. या अनुषंगाने वरिष्ठांचे निर्देश घेऊन परळी पोलिसांनी या दोघाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला केला आहे. याबाबत देवराव लुगडे यांनी दिलेल्या फिर्यादीत हाके हे भाषणामध्ये मराठा समाजाला उद्देशून म्हणाले की, तुम्ही आता ओबीसी मध्ये आलात, आता पहीले ११ विवाह आपल्या आपल्या मध्ये ठरवूयात, तुम्ही आमच्यात आल्याने जात पात राहीली का? पाटील, ९६ कुळी, क्षत्रिय तुम्ही राहीलात का? तसेच त्याच व्हीडीओ मध्ये नवनाथ वाघमारे रा. जालना यांनी मराठवाड्यातील मराठा समाज हा निजामाची औलाद असुन या निजामाच्या औलादीला आपल्या आरक्षणामध्ये घेवु नका असे वक्तव्य केले होते. ही विधाने जातीच्या आधारावर अपमान होईल असे मराठा समाजा विषयी भाषण केले. मराठा समाजाचा अपमान केला, मानहानी केली असे नमूद करण्यात आले आहे. यावरून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास परळी पोलीस करत आहेत.

चोरीच्या आरोपातील सात जणांना अटकपूर्व जामीन मंजूर

बीड । प्रतिनिधी

दि. २०/८/२०२५ रोजी चकलांबा पोलीस स्टेशन ता. गेवराई जि. बीड येथे १० इसमाचे विरुद्ध भारतीय न्याय सहिता अंतर्गत कलम ३०३(२) ३२४(४) ३२४(५) ३५१(२) ३५१(३) व १९० नुसार गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यांमध्ये आरोप असणाऱ्या सात जणांची अटकपूर्व जामीन अर्ज क्रमांक ८८४ /२०२५ नुसार मा.१ ले तदर्थ जिल्हा सत्र व न्यायाधीश यांच्या कोर्टासमोर अटकपूर्व जामीनाचा अर्ज दाखल केला होता, सदरील जामीन अर्जावर दोन्ही बाजूने युक्तिवाद मा. न्यायालयाने ऐकून घेतला. आरोपीकडून ॲड. किशोर खेडकर, ॲड. अनिल बारगजे यांनी योग्य कायदेशीर युक्तिवाद करत सर्व आरोपींना दिनांक १५ /९ /२०२५ रोजी मा. तदर्थ सत्र न्यायालय,बीड यांनी ७ आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केलेला आहे. या कामी ॲड. विलास ढाकणे, सतीश चव्हाण, झीने साहेब, सुनील आंधळे ,बीड या वकिलांनी अनिल बारगजे व किशोर खेडकर यांना सहकार्य केले.

सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त तीन दिवसीय व्याख्यानमाला

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात दि १७ ते १९ दरम्यान तीन दिवसीय व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. सुंदरराव सोळंके महाविद्यालयात प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प दि.१७ सप्टेंबर रोजी गुंफले जाणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके राहणार आहेत तर

उद्घाटक व व्याख्याते प्रसिध्द साहित्यिक व विचारवंत अनंत राऊत हे प्रसारमाध्यमे आणि भाषेचे बदलते स्वरुप या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. द्वितीय पुष्प दि.१८ सप्टेंबर रोजी प्रसिध्द साहित्यिक व विचारवंत डॉ शैलजा बरुरे गुंफणार असून वर्तमान समाजवास्तव आणि सामाजिक समस्या या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मंगलाताई सोळंके भूषवणार आहेत तर दि.१९ सप्टेंबर रोजी तृतीय पुष्प प्रा. डॉ. वृषाली किन्हाळकर (प्रसिध्द कवयित्री व विचारवंत) गुंफणार आहेत .महाराष्ट्राची सांस्कृतिक वीण उसवते आहे काय...! त्या या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ॲड. भानुदास डक राहणार आहेत तर या व्याख्यानमालेत ॲड. भानुदास डक, माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, सत्यप्रकाश रुद्रवार, डॉ. बळीराम चव्हाण, डॉ. शरद पवार, प्रताप रांजवण, निळकंठराव साबळे, सुरेंद्र रेदासणी, बालासाहेब शिंदे,. आण्णाभाऊ वगरे, डॉ. सुनिल गरड, डॉ. शिवाजीराव मुंडे, शिवाजीराव सुतार, विनायक कदम प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या व्याख्यानमालेला उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य डॉ. जी.के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ.एन.के. मुळे , उपप्राचार्य डॉ एम ए कव्हळे, समन्वयक प्रा. डॉ. भाऊसाहेब राठोड, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे, प्रा. अशोक दौंडे, प्रा. ज्ञानेश्वर कुंडकर, रजिस्ट्रार प्रशांत चव्हाण यांनी केले आहे.

बँक हे केवळ आर्थिक व्यवहाराचा मंच नसून समाजाच्या उन्नतीचा दीपस्तंभ आहे -मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

विश्वास, सेवा आणी सहकार्य या तीन तत्वावर चालणाऱ्या अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि १३ रोजी शहरातील आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात बँकेचे सर्व ग्राहक, सभासद व खातेदारांच्या उपस्थितत अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. याप्रसंगी बोलताना संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी बँक हे केवळ आर्थिक व्यवहाराचाच मंच नसून समाजाच्या उन्नतीचा दीपस्तंभ असल्याची भावना व्यक्त केली. जनसामान्यांच्या आर्थिक विकासाला गती मिळून त्यांचे जीवनमान उंचावे यासाठी अंबाजोगाई पिपल्स बँकेची मागील २९ वर्षांपूर्वी निर्मिती केली असेही मत देखील या सर्वसाधारण सभेत राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी , उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी ,यांच्यासह पिपल्स बँकेचे संचालक प्रा. वसंत चव्हाण , एँड विष्णुपंत सोळंके, पुरुषोत्तम चोकडा ,एँड सुधाकर कऱ्हाड, संकेत मोदी, सुधाकर

विडेकर, शेख दगडू शेख दावल, प्रकाश लखेरा,श्रीमती वनमाला रेड्डी, स्नेहा हिवरेकर, हर्षवर्धन वडमारे, तज्ञ संचालक संदेश बोराडे, प्रा. बाळासाहेब चव्हाण ,एँड अनिल व्यवहारे, लक्ष्मण दासूद , सचिन बेंबडे , हाजी महमूद, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांच्यासह सभागृहात जेष्ठ सभासद तथा मार्गदर्शक प्रा नानासाहेब गाठाळ, प्राचार्य बी आय खडकभावी, दिनकर जोशी, डॉ आरसुडे, प्रा शांतीनाथ बनसोडे, प्रा. माणिकराव लोमटे,प्रा. बळीराम जोगदंड, प्रा. एस पी कुलकर्णी, मुझमील खतीब, संजय भोसले, महादेव आदमाणे, अमोल लोमटे , धम्मा सरवदे, दिनेश भराडिया,युवराज काळम पाटील रोटरी क्लब च्या अध्यक्षा रोहिणी पाठक, शेतकरी संघटनेचे कालिदास आपेट यांच्यासह अनेक ग्राहक व सभासद उपस्थित होते .

आर्थिक वर्ष सन २०२४-२५ सालच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुरुवात दीपप्रज्वलन व श्री योगेश्वरी देवीच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर आर्थिक वर्षात दिवंगत झालेले नेते, देशभक्त, सैनिक, खेळाडू, विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती,बँकेचे सभासद, ठेवीदार ग्राहक यांना आदरांजली वाहण्यात आली. त्याचबरोबर बँकेच्या सभासदांची विविध क्षेत्रात पदोन्नती तथा वेगवेगळ्या समित्यांवर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे तसेच बँकेच्या सभासद व कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचे शैक्षणिक क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविल्याबद्दल पाल्यांचे अभिनंदन केले. मागील आर्थिक वर्षाचा इतिवृत्त बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी सादर केला. तसेच वार्षिक सभेपुढील विषयांचे वाचन जेष्ठ संचालक ऍड विष्णुपंत सोळंके यांनी केले. यावेळी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलवर डॉ राजेश इंगोले यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर उत्कृष्ट ग्राहक म्हणून देखील काही निवडक खातेदारांचा देखील सन्मान करण्यात आला. आपले अध्यक्षीय भाषण व २०२४-२५ चा वार्षिक अहवाल सादर करताना बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले की अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेने सन २०२४-२५ मधील केलेल्या उत्तम कामकाजामुळे व ग्राहकांच्या विश्वासामुळे ३१ मार्च २०२५ अखेर बँकेच्या ठेवी ५७३ कोटी झाल्या असून आजपर्यंत त्यात वाढ होऊन ६०० कोटींचा टप्पा पुर्ण केला आहे. यापुढेही असाच नवीन उच्चांक गाठण्याचा संकल्प बँकेच्या सर्व संचालक, सभासद व कर्मचारी वर्गाने घेतला आहे. अंबाजोगाई शहरातील केवळ एकट्या मुख्य शाखेत ४०हजार खातेदार असून सर्व शाखांतील ग्राहकांची संख्या ही १ लाखापेक्षा जास्त आहे. मार्च २०२५ अखेर बँकेचे वसूल भागभांडवल हे रू १९ कोटी असून मागील वर्षाच्या तुलनेत रुपये ०१ कोटीची वाढ झालेली आहे.बँकेचा स्वनिधी हा रुपये ४५ कोटी असून त्यात मागिल वर्षीच्या तुलनेत ९.२६ % एवढी वाढ झाली आहे. राखीव निधी हा १४ कोटी ३४ लाख रुपये एवढा आहे. बँकेने रिझर्व्ह बँकेच्या नियमास आधीन राहून ग्राहकांना रु.३३० कोटी २ लाख रुपये एवढा कर्ज पुरवठा केला असल्याचे बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले. मार्च २०२५ अखेर बँकेची एकूण गुंतवणूक रु २८९ कोटी ११ लाख एवढी आहे . चालू वर्ष अखेरीस बँकेस करपसच्यात ४ कोटी ७१ लाखांचा नफा झाला असून बँकेच्या वतीने सभासदाना ९% घसघशीत असा लाभांश देण्याची घोषणा याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी केली. मागील आर्थिक वर्षात अंबाजोगाई पिपल्स बँकेस विविध पुरस्कार प्राप्त झाल्याचे संस्थापक राजकिशोर मोदी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात राजकिशोर मोदी यांनी सांगितले.

सरपंचांना हाताशी धरून माजी सभापती शिंदेंनी केला लाखोंचा भ्रष्टाचार; खळेगाव सरपंच पदमाबाई कर्हे अपात्र

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील खळेगाव ग्रामपंचायत निवडणूक डिसेंबर २०२२ मध्ये जनतेतून निवडून आलेले संरपच नऊ सदस्य व दहावा सरपंच असताना . संरपच पद येताच काही दिवसांपासून संरपच हे अडानी आसल्याचा गैरफायदा घेत ग्रामपंचायत सदस्य अशोक शिंदे याने कारभार पाहात लाखो रूपये भ्रष्टाचार केला आहे. कोणतीही ग्रामसभा मासिक सभा बॉडीची मिटिंग न घेता सदस्य यांना विश्वासात न घेता पद आले कि नुसता पैसा...

अधिकारी हताशी धरून लाखो रूपये भ्रष्टाचार केल्याप्रकरणी जिल्हाधिकारी बीड यानी सौ.पदमाबाई शामराव कर्हे यांना अपात्र केले आहे.संरपच पद आल्यावर अशोक शिंदे यांनी मीच संरपच आहे असं मिरवत भष्टाचार केला प्रकरणी उप सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनी जिल्हाधिकारी यांच्या कडे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८चे कलम ७व३६प्रमाणे अर्ज अपील केला उप सरपंच सचिन आहेर व ग्रा.प.सदस्य यांच्या वतीने अँड.के.बी.खोसे , गेवराई यांनी काम पाहिले.सदर प्रकरणात तब्बल बारा सुनावणी झाल्यानंतर प्रकरण निकालावर ठेवण्यात आले.सरद संरपच पद हे ओ.बी.सी.महिलेसाठी राखीव असलेल्या जागेवर जनतेतून निवडून आलेले आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम सात मधील तरतुदीनुसार प्रत्येक वित्तीय वर्षात गावातील मतदाराच्या किमान चार ग्रामसभा व प्रत्येक ग्रामसभेच्या पूर्वी महिलासाठी ग्रामसभा घेणे सरपंचावर बंधनकारक असून ग्रामसभा घेणे ही सरपंचाची जबाबदारी आहे. तसेच प्रत्येक वित्तीय वर्ष सुरू झाल्यानंतर म्हणजे च १ एप्रिल नंतर पहिली ग्रामसभा ही वित्तीय वर्ष सुरू झाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या आत म्हणजे ३० मे किंवा त्या पूर्वी घेणे सुद्धा सरपंचावर बंधनकारक आहे आणि कलम २६ प्रमाणे प्रत्येक महिन्यात ग्रामपंचायत सदस्यांची मासिक मीटिंग/ मासिक सभा घेणे ही पण सर्वस्वी जबाबदारी सरपंचाची आहे. तसेच ग्रामसभा मासिक मिटिंग घेण्यासाठी प्रत्येक सदस्यांना नोटीस मिळणे गरजेचे असते. आसे आसताणा ग्रामपंचायत उपसरपंच सचिन आहेर यांना मासिक सभेचे एकही नोटीस दिल्याचे ग्रामपंचायत अभिलेखावरून दिसून येत आहे. या सर्व बाबींचा संरपच यांनी उल्लंघन केल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. सदर अपील प्रकरणात जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार पुन्हा गटविकास अधिकारी, गेवराई, यांना अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या त्या अहवालानुसार व अर्जदार व गैर अर्जदार यांचे म्हणणे सर्वंकष विचार करता पुढील बाबी अपील प्रकरणात अर्जदार व विधिज्ञ यांनी दाखल केलेल्या अपील अर्जातील नमुद मुद्दे, उपलब्ध कागदपत्र, पुरावे इत्यादीचे अवलोकन केले असता अर्जदार यांचे अपील विधिग्राह्य असल्याच्या निकषावर माननीय जिल्हाधिकारी बीड यांनी श्रीमती. पद्माबाई शामराव कर्हे, सरपंच ग्रामपंचायत खळेगाव ता.गेवराई.जिल्हा.बीड हे अपात्र ठरविण्यात आले आहेत.

गोदावरी-सिंदफणाच्या पुरामुळे संपर्क तुटला

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यात दोन-तीन दिवसापासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे सिंदफणा नदी आणि गोदावरी गंगेला महापूर आल्याने अनेक गावांना पाण्याने वेडा टाकल्यामुळे संपर्क तुटला आहे मराठवाड्याचा श्रद्धास्थान असलेल्या गंगामसला येथील मोरेश्वरचे मंदिर पूर्ण पाण्यात गेले आहे तर माजलगाव धरणाचे अकरा दरवाजे उघडल्यामुळे सिंदफणा नदी पूर्ण क्षमतेने भरून जात आहे व सांडस चिंचोली गावाला पूर्ण पाण्याने वेढले आहे.

यावर्षी भरपूर पाऊस झाल्यामुळे माजलगाव चे धरण ऑगस्ट महिन्यातच १००% भरले होते आणि गेल्या दोन-तीन दिवसापासून संपूर्ण मराठवाड्यातच जोरदार पाऊस सुरू असल्याने जायकवाडीचे दरवाजे उघडल्यामुळे गोदावरी नदीमध्ये एक ते दीड लाख शिवसेने पाण्याचा विसर्ग सुरू असल्यामुळे गोदावरी भरून वाहत आहे तर माजलगावच्या धरण क्षेत्रामध्ये ही भरपूर पाऊस झाल्यामुळे माजलगाव धरणाचे १० दरवाजे उघडले आहेत त्यामुळे सिंदफणा नदीकाठच्या सांडस चिंचोली गावाला पाण्याने वेढले आहे तर गोदावरी नदीच्या पुरामुळे सोमनाथ अडी शुक्ल तीर्थ लिमगाव,मोगरा या गावांना पाण्याने वेढले आहे तर मोगरा येथील खडकीला पाणी आल्यामुळे मोगरा-डाकेपिंपरी- खतगव्हाण- पोहनेर-साळेगाव-कोथळा आदी गावांचा जाण्या-येण्याचा मार्ग बंद झाला आहे त्याचबरोबर प्रशासनाच्या वतीने सिंदफणा नदी काठावरील शिंपे टाकळी, लुखेगाव, रोशनपुरी, नागडगाव, सांडचिंचोली, देपेगाव, गोविंदपुर मंजरथ या गावांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.

मोफत आरोग्य तपासणी सप्ताह संपन्न ;सद्गुरु मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटलचा उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पिठाधीश परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आशीर्वादाने व गुरुपुत्र चंद्रकांत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ७ ते १४ सप्टेंबर दरम्यान माजलगाव तालुक्यातील सात गावांमध्ये मोफत आरोग्य तपासणी, नाडी परीक्षण व सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शहरातील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात, तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी, पात्रुड, आळसेवाडी, सादोळा, नित्रुड व केसापुरी येथे सदरील आरोग्य शिबीर घेण्यात आले. या प्रत्येक ठिकाणी मोठ्या संख्येने रुग्णांना मोफत आरोग्य सेवा देण्यात आली. यामध्ये बी पी, शुगर, तपासणी, इसीजी, फेजिओथेरेपी , नाडी परीक्षण करून पुढील उपचार देण्यात आले. यामध्ये आरोग्य शिबीरासाठी सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर येथील डॉ गौरकर, डॉ कृष्णा खैरनार तसेच परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज कॅन्सर रिसर्च सेंटर येथील नर्सिंग,

बीएएमएस, फेजिओथेरेपी चा स्टाफ सर्व ठिकाणी उपस्थित होता व श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचा पात्रुड येथील तेजोनिधी फार्मास्युटिकल्स आयुर्वेद एजन्सी औषधे उपलब्ध होते. आरोग्य तपासणी शिबिर सप्ताह यशस्वी करण्यासाठी माजलगाव तालुक्यातील समस्त सेवेकरी परिवार यांनी प्रयत्न केले.

पुलावर मोठमोठे खड्डे; पाऊस पडल्याने वाहन धारकांना त्रास

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील मुख्य पुलावरील खड्डे पडल्यामुळे व सततच्या पावसामुळे असल्यामुळे लोकांच्या अंगावर खड्डयात ले पाणी अंगावर जात असल्याने नाहक त्रास वाहनधारक व पुलाशेजारील व्यापाऱ्यांना व नागरिकांना सोसावा लागत असून. आधी पुलावरील खड्ड्यामुळे त्रास आता पाऊस भरपूर प्रमाणात होत असून येथील खड्डयामुळे वाहनधारकांना गाडी चालवणे अवघड असून व्यापाऱ्यांना व पायी चालणाऱ्या नागरिकांना नाहक त्रास होत असून शहराला कधी चांगला पुढारी मिळेल का नाही असे व्यापारी बोलून दाखवत असून. कधीतरी पाटोदा नगरपंचायतने चांगले काम करून दाखवावे असे पाटोदा शहरातील नागरिक खाजगीत बोलून दाखवत आहे आहेत.

सुनिल साळवे यांच्या कुटुंबावर प्राणघातक हल्ला; पाटोदा तहसीलवर निदर्शने

पाटोदा । प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) जिल्हाध्यक्ष सुनीलभाऊ साळवे यांच्या कुटुंबावर नान्नज (ता. जामखेड) येथे झालेल्या प्राणघातक हल्ल्याने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. समाज बांधवांमध्ये भीषण संताप पसरला असून, हल्लेखोरांना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा व्हावी, यासाठी सर्वपक्षीय पातळीवर तीव्र आंदोलनाचा इशारा पाटोदा तालुक्यात देण्यात आला होता .या निषेधार्थ पाटोदा तहसील कार्यालयावर सोमवारी दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी अकरा वाजता भव्य सर्वपक्षीय निदर्शने करण्यात आले. ग्रामीण तसेच शहरी भागातील

समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून न्यायाच्या लढ्यात पावसाचे पावसाची तमा न करतासहभागी झाले, या प्रसंगी डॉ.नरेंद्र जावळे (रिपब्लिकन नेते) बाळासाहेब जावळे(जेष्ठ नेते) प्रकाश जावळे(न.प.सद्याय) अरविंद सरवदे गौतम जावळे(माझी सरपंच पाटोदा)योगेश सानप ग्रा.प.सदस्य सांगवी ॲड. बाप्पू नाईकनवरे तरी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राहुल भैया जाधव प्रदीप जावळे सूरज (भैय्या)जावळे उमेश शिरसागर लहुजी शक्ती सेनेचे तालुका अध्यक्ष गणेश रणदिवे बहुजन विकास मोर्चाचे अतुल देवडे व सुनील जावळे पँथर सेनेचे विशाल जावळे शहराध्यक्ष बबलू जावळे आदिवासी पारधी महासंघाचे अमर काळे व बंडू काळे राहुल सोनवणे. धनंजय अडागळे व पत्रकार बंधू व इतर शेकडो भीमसैनिक उपस्थित होते.

युसूफवडगावात आरोग्य शिबिरातून ग्रामविकासाला चालना

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील श्री क्षेत्र युसूफवडगांव येथे राजमुद्रा मेडिकल फाऊंडेशन चे अध्यक्ष व कार्ला येथे कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी डॉ. दत्ता तपसे यांच्या ३४ व्या वाढदिवसानिमित्त भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये १५०० पेक्षा जास्त रुग्णांची तपासणी करण्यात आली.

या शिबिरात नेत्र तपासणी, कर्करोग तपासणी, रक्त चाचणी, रक्तदाब, मधुमेह आदी विविध तपासण्या तज्ञ डॉक्टरांनी केल्या.या शिबिरासाठी वडगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ.केशव सारुक ,हाडाचे डॉ.कोठावळे,डॉ.आकाश बचूटे, एस आर टी एम चे डॉ.नितीन साखरे,डॉ सुमेध वागमारे,डॉ

समाधान घुगे,डॉ.रंगनाथ आदनाक, डॉ.राहुल मुंडे,प्राथमिक आरोग्य केंद्र राजेगावचे डॉ.नवनाथ घुले,सी.एच.ओ डॉ.शीतल डोईफोडे,डॉ.सुमित मुंडे,केज उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ.समाधान घुगे व दंतरोग तज्ज्ञ डॉ सोनवणे डॉ.सचिन राऊत,ससून हॉस्पिटलचे जनरल सर्जन डॉ.अन्तेश्वर वडमिलवार डोळ्याचे डॉक्टर अविनाश अघोर,श्रीशा फार्माचे अविनाश बोराडे, लालासाहेब ढाकणे, ज्ञानेश्वर गिरी,विशाल शिंदे, नेत्रतज्ज्ञ अविनाश अघोर,प्रीतम बचूटे, बाप्पासाहेब सोनवणे व प्रा.अशोक देवकर यांनी आपले मोलाचे योगदान दिले.शिबिराला प्रमुख पाहुणे म्हणून रिपाई मराठवाडा प्रवक्ता युवा नेते ज्ञानेश्वर गिरी,आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मल्लिकार्जुन गडकर,वृक्षवली सेवाभावी संस्थेचे सचिव राहुल केंद्रे,रामराव फाऊंडेशनचे सचिव बन्सीलाल भालेराव,युवा नेते किरण सातपुते,नितीन बचूटे,लिंगेश्वर लांमतुरे,किरण जावळे,बाप्पासाहेब सोनवणे,शंभु चोपने,रमेश तपसे,बाळकृष्ण तपसे,अशोक देवकर,सतीश चांबारे आदी मान्यवर उपस्थित होते.या भव्य आरोग्य शिबिरामुळे ग्रामीण भागातील शेकडो नागरिकांना मोफत वैद्यकीय सेवेचा लाभ मिळाला. उपस्थित मान्यवरांनी डॉ. दत्ता तपसे यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच जिल्हा परिषद शाळेमध्ये वाढदिवसाच्या निमित्ताने डॉ तपसे यांनी २०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.या कार्यामुळे त्यांचे पंचक्रोशीमधून आभार व्यक्त करण्यात आले.

बुद्धगया महाविहाराच्या मुक्तीसाठी निर्णायक लढा १७ सप्टेंबरला बीडमध्ये महामोर्चा -अजय सरवदे

बीड । प्रतिनिधी

बुद्धगया सिद्धार्थ गौतमांनी बुद्धत्व प्राप्त केलेले पवित्र स्थळ, जगातील सर्व बौद्धांचे सर्वोच्च श्रद्धास्थान! पण विडंबना अशी की, या महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन आजही शैव पंथीय महंताकडे आहे. बिहारमधील आजवरच्या सर्व सरकारांनी या अन्यायकारी व्यवस्थापनाला उघड पाठबळ दिले आहे.

महाबोधी विहाराचे व्यवस्थापन महंतांकडून मुक्त करण्यासाठी अनागारिक धम्मपाल यांनी १८९१ पासून आंदोलन सुरू केले. मात्र १३४ वर्षांनंतरही हा विहार महंतांच्या ताब्यातच आहे. भारतात कोणत्याही धर्मीय स्थळाच्या व्यवस्थापनात परधर्मीयांना जागा नाही मशिदीत मौलवी असतात, चर्चमध्ये पादरी असतात, गुरुद्वाऱ्यात शिख धर्मगुरू असतात, मंदिरात हिंदू व्यवस्थापक असतात!

मग बौद्धांच्या पवित्र महाविहारात वैदिक महंत व्यवस्थापक कसे?

१९४९ च्या कायद्यानुसार नऊ सदस्यीय व्यवस्थापन समितीत तब्बल पाच ब्राह्मण आहेत. वैदिक धर्मीय ब्राह्मणांना बौद्ध विहाराच्या व्यवस्थापनाचा अधिकार कसा काय? हा प्रश्न आजही अनुत्तरीत आहे!ही लढाई ब्राह्मण महंतांच्या एकाधिकारशाही आणि लूटखोरीविरुद्ध आहे. हा संघर्ष बौद्ध समाजाचा आहेहिंदू समाजाशी नाही. हा संघर्ष वैदिक धर्मसंस्कृती विरुद्ध बौद्ध धम्मसंस्कृती असा आहे.अखिल भारतीय बौद्ध महासभेच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन आता निर्णायक टप्प्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर १७ सप्टेंबर २०२५ रोजी बीड येथे महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.हा मोर्चा डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय बीड असा काढण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व बौद्ध समाजाने, गटतटपक्षसंघटना यांचे मतभेद विसरून या महामोर्चात एकजुटीने सहभागी व्हावे, ही नम्र पण ठाम विनंती आहे.चला तर मग१७ तारखेला आपल्या हक्कासाठी, न्यायासाठी आणि बौद्धगया महाविहाराच्या मुक्तीसाठी हजारोच्या लाखोंच्या संख्येने रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे. सरकारला आपली महाशक्ती दाखवूया! असे आवाहन वंचित बहुजन आघाडी बीड पश्चिमचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, खंडू जाधव, सचिन मेघडंबर, ज्ञानेश्वर कवठेकर, लखन जोगदंड, मिलिंद सरपते, किरण शेलार, देवा गव्हाणे, निखिल तांगडे, आकाश साबळे, कुमार साबळे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी आवाहन केले आहे.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
मंगळवार दि.१६ सप्टेंबर २०२५
४

दराअभावी घेवडा उत्पादक अडचणीत

व्यापरी ठरवू लागले भाव, साठवण सोय नसल्याने शेतकरी हतबल

पुणे : सद्या घेवडा पिकाची सुगी हातघाईवर आली आहे. पाऊस व ढगाळ वातावरणामुळे साठवणूक करता येत नसल्यामुळे मळणीनंतर माल शेतातून थेट काट्यावर नेला जात आहे. खरेदी प्रक्रियेत व्यापारी प्रतवारीनुसार ठरवतील तो दर दिला जात असून, उत्पादकांना नुकसान सहन करावे लागत आहे. पोत्याला दोन ते चार किलो मालाची कपात केली जाते.

अनेक ठिकाणी खरीप हंगामातील महत्त्वाचे पीक म्हणून घेवड्याची ओळख आहे. सद्या तो काढणी आल्याने काढणीसोबत शेतातच मळणी करून शेतीमाल थेट काट्यावर नेला जात आहे. व्यापाऱ्यांकडून प्रतवारीनुसार ५५ ते ६८ रुपये किलोप्रमाणे दर दिला जात आहे. हा दर अत्यल्प असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. एकरी पाच क्विंटल उत्पादन निघत आहे. ज्यांच्या पेरण्या लवकर झाल्या होत्या, त्या पिकास सततच्या



पावसाचा फटका बसला आहे. उशिरा पेरणी झालेला घेवडा चांगला आहे. दर वर्षीप्रमाणे यंदा बीड, धाराशिव, लातूर, जालना जिल्ह्यांतून बहुतांश मजूर घेवडा काढणीला दाखल झाले आहेत. काढणीसाठी ते एकरी तीन हजार रुपये घेत आहेत. मात्र, परतीचा पाऊस घोंघाऊ लागल्याने पिकाची नासाडी होण्याच्या भीतीने शेतकरी धास्तावला आहे. घेवडा खरेदी करणारे व्यापारी संख्या फार कमी आहे. आवक वाढल्याने भाव पडू लागले आहेत. दर वर्षी पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे घेवडा ओलसर राहतो. आर्द्रता तपासून त्याची खरेदी केली जाते.

कृषी विभागाकडून नियंत्रण करण्याची गरज

'व्यापारी ठरवतील तो दर' याप्रमाणे खरेदी प्रक्रिया सुरू आहे. माल दिल्लीच्या व्यापाऱ्यांना पाठवला जातो. तिकडे त्याचा दर जवळपास १२० ते १५० रुपये किलो राहतो. शेतकरी ते ग्राहक यादरम्यान दरात दुपटीचा फरक पडतो, तरीही स्थानिक व्यापारी शेतकऱ्यांना जादा दर देत नाहीत यासाठी खरेदी प्रक्रियेवर कृषी विभागाने नियंत्रण ठेवणे शेतकऱ्यांसाठी गरजेचे आहे.

तुरीच्या अधिक उत्पादनासाठी या उपायांचा अवलंब करा

तूर हे भारतातील एक महत्त्वाचे कडधान्य पीक आहे. हे पीक सलग किंवा मुख्यत: आंतरपीक म्हणून इतर पिकात घेतले जाते. परंतु अनेकदा या पिकाच्या उत्पादनात घट येते. तूर पिकामध्ये वेळोवेळी काही गोष्टींचा अवलंब केल्यास उत्पादनात वाढ करता येते.

तूर पिकाच्या ओळींमध्ये खांडण्या : दोन झाडांतील अंतरानुसार मजुरांद्वारे खांडण्या भरणे आवश्यक आहे. काही ठिकाणी डोबणी २-३ वेळा करून खांडण्या बुजवणे आवश्यक आहे.

निंदणी : ट्रॅक्टर किंवा बैलजोडीने पेरणी केलेल्या तूर पिकाची निंदणी वेळीच करणे आवश्यक आहे. सोयाबीनसोबत आंतरपीक असल्यास सोडओळ (पट्टापेर) पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

शेंडे छाटणे : पीक २५ ते ३० दिवसांचे असताना शेंडे छाटून घ्यावेत. अलीकडे शेंडे छाटण्याची सुरक्षित अशी छोटी यंत्रे उपलब्ध आहेत. छाटणी केल्यानंतर बुरशीनाशकाची फवारणी करणे आवश्यक आहे.

पाणी व्यवस्थापन : शेवरा अवस्थेपूर्वी आणि शेंगांमध्ये दाणे भरताना ओलीत करणे आवश्यक आहे. जमिनीत मुबलक ओल असल्यासच शेंडे छाटणे आवश्यक आहे.

रोग आणि किडींचे नियंत्रण : शेवरा अवस्थेच्या सुरुवातीला, फुलोरा अवस्थेच्या सुरुवातीला आणि शेंगांमध्ये दाणे भरताना योग्य कीटकनाशकांचा वापर करणे आवश्यक आहे.

इतर महत्त्वाच्या गोष्टी : सलग तूर लागवडीसाठी जोडओळ पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

बीटी कपाशी आणि तूर यांच्यातील आंतरपीक पद्धतीमध्ये दोन्ही पिकांची जोडओळ पद्धतीने पेरणी करणे आवश्यक आहे. योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात खते आणि सूक्ष्मसंजीवके देणे आवश्यक आहे. योग्य वेळी आणि योग्य तंत्रज्ञानाचा वापर करून काढणी करणे आवश्यक आहे. या गोष्टींचा अवलंब केल्याने तुम्हाला तुमच्या तूर पिकाचे उत्पादन निश्चितच वाढवता येईल.

संत्रावर्गीय फळपिकांवर 'कोळी किडीचा' प्रादुर्भाव झाल्यास उपाय

मोसंबी व संत्रा फळ पिकांवर कोळी किडीचा प्रादुर्भाव बऱ्याचवेळा आढळून येत असतो. कोळी ही कीड अष्टपाद वर्गातील असून, आकाराने सूक्ष्म असते. साध्या डोळ्याने दिसणे कठीण जाते. पानांच्या शिराजवळ किंवा बरेचदा फळांच्या सालीवर बारीक खळग्यात ती अंडी घालते. प्रौढ लांबट, पिवळे असून, पिल्ले फिक्कट पिवळसर असतात. पिल्ले व प्रौढ कोळी आकाराचा फरक सोडल्यास सारखेच दिसतात. यामध्ये रस्ट माईट व ग्रीन माईट या कोळी प्रजातींचा उद्रेक आढळून आला आहे. कोळीचा प्रादुर्भाव वर्षभर असला तरी फळ धारणेपासून ते फळ काढणीपर्यंत आणि ऑगस्ट ते ऑक्टोंबर दरम्यान जास्त असतो.

रस्ट माईट प्रादुर्भावाची लक्षणे : कीड पाने व फळांचा पृष्ठभाग खरवडतात व त्यातून येणारा रस शोषून घेतात, त्यामुळे पानांवर आणि फळांवर करडे ठिपके आढळून येतात. प्रादुर्भाव वाढल्यास फळांवर तपकिरी लालसर रंगाचे चट्टे पडतात. या अवस्थेला शेतकरी 'लाल्या' म्हणून ओळखतात. या किडीमुळे फळांचे नुकसान होऊन अनियमित आकाराची फळे तयार होतात. प्रादुर्भावग्रस्त फळांचा रंग बदलतो व प्रत खालावते. त्यामुळे बाजारात कमी भाव मिळतो.

कोळी किडीचे व्यवस्थापन : प्रतिबंधात्मक उपाय: उन्हाळ्यामध्ये पाण्याचा ताण दिलेल्या झाडांना योग्य प्रमाणात पाणी मिळत आहे याची खात्री करून घ्यावी. पाण्याचा ताण पडल्यास कोळीचा प्रादुर्भाव वाढतो.

सेंद्रिय उपाय : अझेंडीरॅक्टीन (१%) २ मि.ली. किंवा अझेंडीरॅक्टीन (५%) ०.५ मि.ली. प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून फळधारणेच्या वेळी फवारणी केल्यास ही कीड. नियंत्रणात ठेवता येते. १५ दिवसांच्या अंतराने पेट्रोलियम स्प्रे ऑईल (हॉर्टीकल्चर मिनरल ऑईल) २% प्रति लिटर पाणी या प्रमाणात घेऊन दोनदा फवारणी करावी.

रासायनिक उपाय : कोळीचा प्रादुर्भाव दिसताच डायकोफॉल (१८५ ई सी) २ मिली किंवा डायफेनथीयुरॉन (५० डब्ल्यू पी) २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून फळधारणेच्या वेळी १५ दिवसांच्या अंतराने फवारणी केल्यास ही कीड नियंत्रणात ठेवता येते.

टोमॅटोवरील विषाणूजन्य रोगांचे नियंत्रण

गेल्या ४ ते ५ वर्षांपासून टोमॅटो उत्पादक पट्ट्यांमध्ये विविध विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढताना दिसून येत आहे. विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव झाल्यावर टोमॅटो लवकर पिकणे, रंगाने पिवळे होणे, फळांमध्ये विकृती अशी विविध लक्षणे दिसून येतात. अशा फळांना दर न मिळाल्याने आर्थिक नुकसान होते. या विषाणूजन्य रोगांचा प्रसार प्रामुख्याने मावा, तुडतुडे, पांढरी माशी, फुलकिडे इ. रसशोषक किडींमुळे होतो. रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विषाणूच्या वाहक रसशोषक किडींचे वेळीच नियंत्रण करणे गरजेचे आहे.

टोमॅटो मोझॅक व्हायरस (सीएमव्ही) :हा विषाणूजन्य रोग टोबॅको मोझॅक व्हायरस, कुकुंबर मोझॅक व्हायरस, पोटॅटो मोझॅक व्हायरस यांच्यामुळे होतो. सुमारे १२०० पेक्षा जास्त वनस्पतींवर रोगाचा प्रादुर्भाव आढळून येतो. हा रोग मुख्यत्वे रोपवाटिका व पिकाच्या वाढीच्या अवस्थेत येतो. पाने फिक्कट पिवळसर, बुटाच्या लेसप्रमाणे लांबलेली, वाकडी दिसणे अशी लक्षणे दिसत आहेत. पानांना हिरवट पिवळसर डाग, वाढ खुंटणे, रंगहीन, उशिरा पक्व होणारी, लहान आकाराची फळे आढळून येतात. या रोगाचा प्रसार मावा किडीमार्फत होतो.

पोषक वातावरण : तापमान २५ ते ३० अंश सेल्सिअस, आर्द्रतायुक्त, ढगाळ व दमट हवामानात रोगाचा प्रादुर्भाव जास्त वेगाने होते. त्यामुळे रोगाचा प्रसार वाढतो.

टोमॅटो क्लोरोसिस व्हायरस : या विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव पिकाच्या कोणत्याही अवस्थेत होऊ शकतो. रोपवाटिकेतून आलेल्या रोपांत विषाणूचा प्रादुर्भाव असेल तर प्रादुर्भाव लवकर होतो. सुरुवातीला पानांवर अनियमित विविध रंगांचे,

आकाराचे ठिपके पडतात. पानांच्या शिरा हिरवट राहून, इतर पानांचा भाग हिरवट पिवळसर होतो. पिवळसरपणा हळूहळू तीव्र होतो. मॅग्नेशिअमची कमतरता असल्यासारखी लक्षणे दिसतात. त्यामुळे रोगाची ओळख पटविणे कठीण होते.

रोगाची लक्षणे : वाढीच्या सुरुवातीच्या काळात बुरशीपासून होणाऱ्या लवकर व उशिरा येणाऱ्या करपा रोगासारखी दिसतात. त्यामुळे रोगाची योग्य ओळख पटविण्यात अडचणी येतात. प्रादुर्भावाची सुरुवात शेंड्याकडून होते. शेंड्याकडून नवीन पानांवर लहान तांबूस काळसर ठिपके, चट्टे, तपकिरी वर्तुळे दिसून येतात. पुढे तीन ते चार दिवसांत कोवळी पाने करपून काळी पडतात. पाने, देठ, कोवळ्या फांद्या आणि खोडापर्यंत पसरत जाऊन तपकिरी काळपट चट्टे पडतात. प्रादुर्भाव लागवडीपासून महिन्यात झाल्यास फळधारणा न होता झाड १० ते १५ दिवसांत करपून मरते. उशिरा प्रादुर्भाव झाल्यास फळांचे तोडे कमी होतात.

लीफकर्ल (पर्णगुच्छ किंवा बोकडच्या) : रोगाचा प्रसार पांढऱ्या माशी मार्फत होतो. रोगाचा प्रादुर्भाव उन्हाळ्यातील किंवा पावसाळ्यानंतरच्या पिकावरील येणारा महत्त्वाचा विषाणू रोग आहे. रोप अवस्थेत प्रादुर्भाव झाल्यास रोपांची वाढ खुंटते. रोपाची पाने खालच्या दिशेने गुंडाळी होऊन सुरकुतलेली दिसतात. त्यामुळे नवीन तयार होणाऱ्या पानांवर पांढरे चट्टे दिसून येतात. गुंडाळी झालेली पाने खरबरीत आणि ठिसूळ बनतात. शाकीय वाढ कमी होते. त्यामुळे रोपांची वाढ खुंटते. प्रादुर्भावित रोपे मलूल दिसतात. रोपे झुडपांसारखी वाढ झालेले दिसतात. रोपे संपूर्णत: वांझोटी बनतात. पाने जाड होऊन खरबरीतपणा येतो. पानाची खालची बाजू जांभळी बनते. फळे आकाराने लहान राहतात.

संरक्षण करण्यासाठी उपाययोजना : लागवडीसाठी खात्रीशीर आणि दर्जेदार, रोगास प्रतिरोधक, सहनशील वाणांचा वापर करावा. बंगळूर येथील राष्ट्रीय फळबाग संशोधन संस्थेने अर्का रक्षक, अर्का सम्राट, अर्का अभेद्या या जातींची शिफारस आहे. परवानाधारक रोपवाटिकेतूनच रोपांची खरेदी करावी. रोपवाटिकेमध्ये इन्सेक्ट नेट-हाऊस, पॉलिहाउस, शेडनेट हाउस अशा सुविधा असाव्यात. रोपवाटिकेमध्ये रसशोषक किडी (मावा, फुलकिडे, पांढरी माशी इ.) याचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. रोपे ४० ते ६० मेश नायलॉनच्या जाळीच्या मंडपामध्ये तयार केल्यास रसशोषक किडींचा प्रादुर्भाव कमी करता येतो. साधारण २० दिवसांपेक्षा कमी वयाचे किंवा २८ दिवसांपेक्षा जास्त वयाची रोपे लागवडीसाठी वापरू नयेत. रोपांचे पुरेसे हार्डनिंग झालेले असावे.

जैविक नियंत्रण :निंबोळी अर्क (५ टक्के) किंवा अझाडिरेक्टिन (१५०० पीपीएम) ३० मिलि किंवा व्हर्टिसिलियम लेकॅनी किंवा मेटारायझीम ॲनिसोप्ली ४० ग्रॅम

रासायनिक नियंत्रण : डायमेथोएट (३० टक्के) २० ग्रॅम किंवा इमिडाक्लोप्रीड (१७.८० टक्के) ५ ग्रॅम किंवा थायामेथोक्झाम (२५ टक्के) ३ ते ४ ग्रॅम किंवा याप्रमाणे दर १० दिवसांच्या अंतराने आलटून पालटून फवारणी करावी. (लेबल क्लेम आहेत.)

महत्वाच्या घटना

१६२० : 'मेफ्लॉवर' जहाजाने साउदॅम्पटन बंदरातुन उत्तर अमेरिकेकडे प्रयाण केले.
१८२१ : मैक्सिकोच्या स्वातंत्रतेला मान्यता देण्यात आली होती.
१८६१ : ब्रिटन देशांतील पोस्ट ऑफिस मध्ये बचत खाता उघडण्यास सुरुवात झाली.
१९०८ : 'जनरल मोटर्स कॉर्पोरेशन' या कंपनीची स्थापना झाली.
१९३५ : इंडियन कंपनीज ॲक्ट अन्वये 'बँक ऑफ महाराष्ट्र'ची नोंदणी करण्यात आली.
१९४५ : दुसरे महायुद्ध हाँगकाँगमधील जपानी सैन्याने रॉयल नेव्हीसमोर शरणागती पत्करली
१९६३ : झेरॉक्स ९१४ या प्रतिमुद्रक यंत्राचे पहिले प्रात्यक्षिक.
१९६७ : सोव्हियत संघाने पूर्व कजाख मध्ये आण्विक चाचणी केली.
१९७५ : पापुआ न्यू गिनी या देशाला (ऑस्ट्रेलियापासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९८७ : ओझोनच्या थराच्या कमीत कमी संरक्षण करण्यासाठी मॉन्ट्रियल प्रोटोकॉलवर स्वाक्षरी केली आहे.
१९९७ : आय. टी. सी. आंतरराष्ट्रीय मैदानी स्पर्धेत राजीव बालकृष्णन याने शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीत १०.५० सेकंद वेळ नोंदवून राष्ट्रीय विक्रम केला.
१९९७ : संस्कृत भाषेसंदर्भात प्रशंसनीय कार्य केल्याबद्दल मुंबई येथील मराठा मंदिर संस्थेच्या वरळी हायस्कूलमधील संस्कृतचे निवृत्त शिक्षक पं. गुलाम दस्तगीर अब्बासअली बिराजदार यांना 'राष्ट्रीय संस्कृत पंडित' हा राष्ट्रपतींकडून दिला जाणारा पुरस्कार जाहीर
२००८ : भारतीय हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड (भेल) च्या कर्मचाऱ्यांना विश्वकर्मा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३८० : चार्ल्स (सहावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: २१ आक्टोबर १४२२)
१३८६ : हेन्री (पाचवा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: ३१ ऑगस्ट १४२२)
१८५३ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन डॉक्टर आल्ब्रेख्त कॉसेल यांचा जन्म.
१८८८ : बेंटले मोटर्स लिमिटेड चे डब्ल्यू ओ. बेंटले यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट १९७१)
१९०७ : वामनराव सडोलीकर भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या जयपूर-अत्रोली घराण्यातील प्रसिद्ध शास्त्रीय गायक (मृत्यू: २५ मार्च १९९१)
१९१३ : कमलाबाई कृष्णाजी ओगले 'रुचिरा' या पाकशास्त्रावरील प्रचंड खपाच्या पुस्तकाच्या लेखिका (मृत्यू: २० एप्रिल १९९९)
१९१६ : एम. एस. सुब्बुलक्ष्मी भारतरत्न, पद्मभूषण, पद्म विभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शास्त्रीय कर्नाटकी गायक (मृत्यू: ११ डिसेंबर २००४)
१९२३ : सिंगापूरचे पहिले पंतप्रधान ली कुआन यी यांचा जन्म. (मृत्यू: २३ मार्च २०१५)
१९२५ : आयर्लंडचे पंतप्रधान चार्ल्स हॉगे यांचा जन्म.
१९३१ : भारतीय क्रिकेट पंच आर. रामचंद्र राव यांचा जन्मदिन.
१९४२ : नामदेव धोंडो तथा 'ना. धों' महानोर निसर्ग कवी व प्रयोगशील शेतकरी, त्यांना 'पानझड' या कवितासंग्रहासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. १९ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.
१९५४ : संजय बंदोपाध्याय भारतातील बंगाली हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील प्रख्यात सितार वादक
१९५६ : डेव्हिड कॉपरफिल्ड अमेरिकन जादूगार
१९७१ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध गीतकार, पटकथा लेखक व कवी प्रसून जोशी यांचा जन्मदिन.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६८१ : मुघल शासक दारा शिकोह आणि सम्राट औरंगजेब यांची मोठी बहीण जहाँनारा बेगम यांचे निधन.
१७३६ : डॅनियल फॅरनहाइट जर्मन शास्त्रज्ञ (जन्म: २४ मे १६८६)
१८२४ : लुई (अठरावा) फ्रान्सचा राजा (जन्म: १७ नोव्हेंबर १७५५)
१९३२ : सर रोनाल्ड रॉस हिवतापाच्या जंतुंचा शोध लावल्याबद्दल नोबेल पारितोषिक मिळवणारे (१९०२) ब्रिटिश डॉक्टर (जन्म: १३ मे १८५७ आल्मोडा, उत्तराखंड)
१९४४ : भारतीय अभियंता व काशी हिंदू महाविद्यालयाचे माजी उप कुलगुरू ज्वालाप्रसाद यांचे निधन.
१९६५ : फ्रेड क्रिम्बी अमेरिकन ॲनिमेशनपट निर्माते (जन्म: ३१ जुलै १८८६)
१९६५ : परमवीर चक्र पुरस्कार विजेता भारतीय सैन्य अधिकारी लेफ्टनंट कर्नल ए.बी. तारापोर यांचे निधन.
१९७३ : पुण्यातील जुन्या पिढीतील सरदार, पर्वती संस्थानचे विश्वस्त, संगीतज्ञ, इतिहासाचे अभ्यासक गंगाधरराव नारायणराव तथा आबासाहेब मुजुमदार यांचे निधन. त्यांचे मूळ नाव श्रीधर पांडुरंग प्रभुणे होते. मुजुमदारांकडे ते दत्तक गेले. पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाचे ते चोवीस वर्षे चिटणीस होते.
१९७७ : केसरबाई केरकर साहित्य नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित जयपूर-अतरौली घराण्याच्या भारतीय शास्त्रीय गायिका (जन्म: १३ जुलै १८९२)
१९८४ : बिकीनि चे निर्माते लुई रायर्ड यांचे निधन. (जन्म: १६ सप्टेंबर १९८४)
१९९४ : जयवंत दळवी साहित्यिक, नाटककार व पत्रकार. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, विनोदी लेख असे विविध प्रकार त्यांनी हाताळले. ते 'ठणठणपाळ' या टोपणनावाने विनोदी व मार्मिक लेखन करीत. (जन्म: १४ ऑगस्ट १९२५)
२००५ : लेसर चे शोधक गॉर्डन गूल्ड यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९२०)
२०१२ : आयमॅक्स चे सहसंस्थापक रोमन कोरियटर यांचे निधन. (जन्म: १२ डिसेंबर १९२६)
२०१७ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय वायुदलाचे वरिष्ठ अधिकारी मार्शल अर्जन सिंह यांचे निधन.

जिल्हा मध्यवर्ती बँक प्रशासनाचा भाजपाकडून जाहीर निषेध

सभापती प्रा. राम शिंदे यांचा फोटो प्रकाशित न केल्याबद्दल निषेध

जामखेड

तालुका भारतीय जनता पार्टी पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने सन २०२४/२५ या वर्षांच्या प्रकाशित केलेल्या आर्थिक ताळेबंद अहवालात महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांचा फोटो खोडसाळपणे टाळल्याचा तसेच त्यांचा अवमान केल्याचा आरोप करत जामखेड भारतीय जनता पार्टीच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला असून जामखेड येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखेसमोर हे जाहीर निषेध अंदोलन करण्यात आले.

आज दि. १५ सप्टेंबर रोजी करण्यात आलेले आंदोलनावेळी भाजपा ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात, बाजार समितीचे सभापती पै. शरद कार्ले, पंचायत समितीचे माजी सभापती डॉ. भगवान मुरूमकर, बाजार समितीचे उपसभापती नंदकुमार गोरे, भाजपाचे ग्रामीण मंडळ तालुका अध्यक्ष

बापूराव ढवळे, शहर मंडळ अध्यक्ष संजय काशिद, पांडुरंग उबाळे, बाजार समितीचे संचालक गौतम उतेकर, वैजिनाथ पाटील, संचालक रविंद्र हुलगुंडे, सचिन घुमरे, नारायण जायभाय, राहुल बेदमुथ्था, डॉ. गणेश जगताप, माजी युवा मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष मोहन (मामा) गडदे, नगरसेवक अमित जाधव, तात्याराम पोकळे, गोरख घनवट, उध्दव हुलगुंडे, मोहन देवकाते, उदयसिंह पवार, डॉ. जयराम खोत, रखमाजी मुंडे, महालिंग कोरे, राजेंद्र ओमासे, चेअरमन अशोक महारनवर, सरपंच महारुद्र महानवर, जालिंदर चव्हाण, सुशिल आव्हाड, राहुल चोरगे, डॉ अल्ताब शेख, अजय सातव, भैय्या थोरात, गणेश लटके, श्रीराम डोके, संदीप जायभाय, बाळासाहेब गोपाळघरे, मा. ऋषिकेश नेरकर, राजू गोरे, कल्याण शिंदे, किरण जाधव, मिलिंद देवकर, संजय बेरड, अन्सार पठाण, भारत ढवळे, बाबासाहेब फुलमाळी, पृथ्वीराज भोसले, भारत उगले, मलिकभाई, अंगद गव्हाणे, चेअरमन मगन बहीर, गौतम को ल्हे, विशाल भांडवलकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. निषेधार्थ दरम्यान जिल्हा बँक प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करत अहवालातील सभापतींचा फोटो प्रकाशित न केल्याबद्दल संताप व्यक्त करण्यात आला. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बँक प्रशासनाने तात्काळ सभापतींचे छायाचित्र समाविष्ट करावे अशी मागणी केली. यावेळी जिल्हा बँक जामखेड शाखेसमोर जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

दिव्यांग महिलेसोबत मुजोरी करणाऱ्या तलाठ्यावर गुन्हा दाखल करा

जालना । प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील नांजा जैनपुर कोठारा येथील अंगतराव वीर या तलाठ्यांनी अपंग महिला सुनीता जाधव यांनी इंदिरा गांधी राष्ट्रीय विकलांगता पेन्शन योजने अंतर्गत लाभ मिळवण्यासाठी अर्ज केला असता त्यावर तलाठी यांची सही लागत असल्यामुळे त्या महिलांनी त्यांच्याकडे सही मागण्यासाठी गेले असता त्यांनी एका हॉटेल मध्ये दारूचे बिल भरण्याचे सांगितले. अपमानकरण वागणूक दिली असल्याचे समोर आले आहे. सदरील तलाठ्याची एका प्रकारे मुजोरी समोर आली आहे. त्याच्या विरोधात दिव्यांग हक्क २०१६ कलम नुसार गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी दिव्यांग संघटनेकडून करण्यात आली आहे.

दि.१४/०९/२०१५ झालेल्या घटनेमुळे सर्व दिव्यांग संघटना यांचा या घटनेचा निषेध करत कारवाईची मागणी केली आहे. सदरील तलाठी त्याच्या विरोधात दिव्यांग हक्क २०१६ कलम नुसार गुन्हा दाखल करून त्या महिलांना न्याय देण्यात यावा. त्या तलाठ्याची प्रॉपर्टीची चौकशी करून त्याला सेवेतून निलंबित करण्यात यावे. त्यांनी आतापर्यंत अशा कित्येक दिव्यांग महिलांना त्रास दिला असेल हे सांगता येणार नाही. तलाठ्याच्या विरोधात दिव्यांग हक्क २०१६ कलम नुसार गुन्हा दाखल करून त्या दिव्यांग महिलेला न्याय देण्यात यावी अशी मागणी निवेदन देऊन करण्यात आली आहे. सकल दिव्यांग सामाजिक संघटना यांच्या कडून देण्यात आलेल्या निवेदनावर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शंकर शिरगुळे यांच्या राहुल मुळे प्रकाश येडके सह्या आहेत.

पाण्याच्या पुराने वेढा मारलेल्या दोन कुटुंबांना बाहेर काढले

अंबड। प्रतिनिधी

अंबड – शहागड रोडवरील मांगी नदी नदीला १३ सप्टेंबर रोजी मुसळधार पाऊस झाल्यामुळे मोठा पूर आला. यावेळी आदिवासी दोन कुटुंबातील सात ते आठ जण अडकले होते. मनोज बानाईत यांच्या माहितीवरून अंबड नगर परिषदेच्या पथकाने सदरील कुटुंबांना सुखरूप बाहेर काढले.

मांगी नदीच्या दोन्ही बाजूस २ पोलमध्ये वयोवृद्ध, स्त्री – पुरुष व लहान मुले उभे होते. त्यांच्या सर्व बाजूने पाण्याने वेढा मारला होता. कमी प्रवाह असलेल्या नदीच्या काठावरून सर्व व्यक्तीचे रेस्क्यू करण्यात आले. रेस्क्यू केलेल्यांमध्ये नवनाथ हेलम वय २५०, विशाल हेलम वय २३, नितेश वाघमारे वय २८, नारायण पवार वय ६०, गणेश पवार वय ३०, तुळशीराम वाघमारे वय ४५, केशव पवार ४५, उषा हेलम वय ३०, पारस हेलम वय

३, आकांक्षा वाघमारे वय ४ यांचा समावेश आहे. यावेळी कोळसा व लाकडे वाहून गेले मात्र कोणतीही जीवित हानी झाली नाही. यासाठी अंबड नगर पालिकेचे अग्निशमन वाहन कर्मचारी सहाय्यक अग्निशमन पर्यवेक्षक जयसिंग सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहन चालक अफसर सय्यद, अहमद शेख (शिपाई), महेंद्र सोनवणे (स्वच्छता कर्मचारी), एजाज अली (शिपाई) यांच्यासह इतर कर्मचारी सहभागी झाले होते.

श्रीगोंदेत खंडणीसाठी व्यापाऱ्याचे अपहरण

अडीच कोटीची मागणी करत ३० लाख स्वीकारले

श्रीगोंदे । प्रतिनिधी

व्यापाऱ्याचे अपहरण करीत जीवे मारण्याची धमकी देऊन त्याच्याकडे अडीच कोटींच्या खंडणीची मागणी करीत ३० लाख ३० हजारांची खंडणी घेतल्याप्रकरणी प्रशांत देविदास मते (वय ४३, रा. शिर्डी, ता. राहाता) यांच्या फिर्यादीवरून श्रीगोंदे कृषी उत्पन्न बाजार समितीचा संचालक बाबासाहेब भाऊसाहेब जगताप, अजय शेळके व शुभम रामचंद्र महाडिक यासह सात ते आठ जणांविरोधात श्रीगोंदे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी शुभम महाडिक यास अटक केली आहे.

फिर्यादी मते यांनी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात कापूस ठेवण्यासाठी गोदाम भाडेतत्त्वावर घेतले होते. ३ सप्टेंबर रोजी फिर्यादी व त्यांचे मित्र नामदेव पवार हे श्रीगोंदे येथील

गोदामावर आले होते. त्यावेळी जगताप, शेळके, महाडिक यांच्यासह सात ते आठ जण गोदामाजवळ गेले. आम्हाला तुमचे धंदे माहिती आहेत, म्हणून दमदाटी करीत फिर्यादीला चारचाकीत बसवले. आडवळणी रस्त्याने नेले. आरोपी जगताप, शेळके व आणखी एकाकडे असे तिघांकडे पिस्तूल होते. अनोळखी इसमाने जीवे मारण्याची धमकी देत अडीच कोटींची खंडणी मागितली. एक कोटी लगेच देण्याची मागणी केली. त्यावेळी फिर्यादीच्या भावाने श्रीरामपूर येथील बँक खात्यावरून तीस लाख रुपये काढून आरोपींनी पाठविलेल्या व्यक्तीकडे दिले. तसेच फिर्यादीने श्रीगोंदे येथील एटीएममधून ३० हजार काढून आरोपींना दिले. चार सप्टेंबर रोजी अजय शेळके याने फिर्यादीला अहिल्यानगर येथील परिवार हॉटेलवर बोलावून घेतले. तिथे प्रमुख आरोपींसह सात ते आठ जण उपस्थित होते. त्यांनी पुन्हा जीवे मारण्याची धमकी देत उर्वरित रकमेची मागणी केली. तेव्हा दुसऱ्या दिवशी पैसे आणून देण्याचे सांगून फिर्यादी तिथून बाहेर पडले. त्यानंतर अजय शेळके हा वारंवार फोन करून जीवे मारण्याची धमकी देत पैशांची मागणी करीत होता. याप्रकरणी शुक्रवारी रात्री श्रीगोंदे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस उपनिरीक्षक गणेश अहिरे पुढील तपास करीत आहेत.

लिंबागणेश ते बोरखेड मार्गावरील रस्ता खचल्याने वाहतूक ठप्प

लिंबागणेश। प्रतिनिधी

रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे लिंबागणेशबोरखेड रस्ता खचला असून परिसरातील गावांतील व वस्तीवरील नागरिकांची दळणवळणाची मोठी अडचण झाली आहे. या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, बाळासाहेब मुळे, सुरेश निर्मळ, संजय घोलप, विजय वाणी, तुकाराम गायकवाड आदी ग्रामस्थांनी केली आहे.

तलाठी पोतदार आणि ग्रामविकास अधिकारी वीर यांच्याकडुन तहसीलदार हजारे यांना अहवाल सादर तलाठी गणपत पोतदार आणि ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी खचलेल्या रस्त्याची व पुरस्थितीची पाहणी करून

तहसीलदार चंदकांत शेळके व गटविकास अधिकाऱ्यांना यासंदर्भात अहवाल सादर केला आहे. या मार्गावर ७ गावे व १२ वस्त्यांचे दळणवळण अवलंबून असून शालेय मुले, दवाखाना, बाजारहाट, शेतीमाल व दुधदुभत्याच्या वाहतुकीसाठी हा रस्ता महत्त्वाचा आहे. मात्र, नळकांडी पुल पावसाळ्यात वारंवार वाहून जात असल्याने येथे कायमस्वरूपी उपाय म्हणून कमानी पुल बांधावा, अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

रयत' च्या सुरक्षा व भौतिक सुविधा समितीवर ॲड. ऋषिकेश डूचे यांची निवड

जामखेड

शासन निर्णयाप्रमाणे गठित करण्यात आलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या शहरातील नागेश विद्यालयाच्या विध्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा समितीच्या कायदेशीर सल्लागार सदस्यपदी ॲड. ऋषिकेश डूचे यांची निवड करण्यात आली या निवडीबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

शासन निर्णयाप्रमाणे सुरक्षा व भौतिक सुविधा समिती ही शाळांमधील विद्यार्थी सुरक्षा आणि भौतिक सुविधांशी संबंधित कामांची देखरेख करते, ज्यामध्ये विद्यार्थ्यांचे संरक्षण करणे, सुरक्षित वातावरणाची निर्मिती करणे आणि आवश्यक सुविधांची पूर्तता करणे समाविष्ट



आहे. इयत्ता १ ते १२ च्या शाळांमध्ये ही समिती असणे बंधनकारक असून ती दर दोन वर्षांनी पुनर्गठित केली जाते आणि त्यात मुख्याध्यापक, पालक, शिक्षक, प्रतिनिधींचा समावेश असतो. त्याप्रमाणे शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या श्री नागेश विद्यालयात सुरक्षा व भौतिक सुविधा समिती गठीत केली असून यामध्ये कायदेशीर सल्लागार सदस्यपदी ॲड. ऋषिकेश मोहन डूचे यांची निवड करण्यात आली या समितीमध्ये तहसीलदार, पोलीस निरीक्षक, गटविकास अधिकारी,व्यावसायिक,डॉक्टर,वकील ,प्रतिष्ठित नागरिक याचा समावेश असतो, ॲड. डूचे यांच्या निवडीचे पत्र नागेश विद्यालयाचे प्राचार्य भगवान मडके यांनी दिले, या निवडीबद्दल तालुका वकील संघ,पत्रकार संघ,आजी माजी शिक्षक,विधार्थी यांनी अभिनंदन केले

अहिल्यानगर जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट'; नागरिकांनी घ्यावी विशेष दक्षता

भारतीय हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार दिनांक १६ व १७ सप्टेंबर २०२५ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यात वीजांचा कडकडाट, जोरदार वारे व मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट' जारी करून नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.पुणे, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यातील धरणांमधून पाण्याचा विसर्ग वाढला असून त्यामुळे जिल्ह्यातून वाहणाऱ्या नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे.

सध्या भिमा नदीवर दौंड पूल येथे ७,६२७ क्युसेक, गोदावरी नदीवरील नांदूर मध्यमेश्वर धरणातून ३,१५५ क्युसेक, प्रवरा नदीवरील निळवंडे धरणातून १०३२ क्युसेक, ओझर बंधारा ६१८ क्युसेक, मुळा

धरणातून १००० क्युसेक, घोड धरणातून ८००० क्युसेक, सीना धरणातून १५०१ क्युसेक, कुकडी नदीवरील येडगांव धरणातून ७५० क्युसेक, हंगा नदीवरील विसापूर धरणातून ११० क्युसेक इतका विसर्ग सुरू आहे. मेघगर्जना होत असताना झाडाखाली, टॉवर, ध्वजांचे खांब किंवा धोकादायक ठिकाणी उभे राहू नये. विद्युत उपकरणांचा वापर टाळावा.नदी, ओढे व नाल्याकाठच्या नागरिकांनी पाणीपातळी वाढल्यास सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. पाण्याने भरलेले पूल ओलांडू नयेत.मोकळ्या जागी असल्यास गुडघ्यावर बसून डोके झाकून घ्यावे.जनावरांचे स्थलांतर सुरक्षित ठिकाणी करावे व शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी नियोजन करावे.पर्यटनासाठी धरणे, नद्या व धबधब्यांच्या परिसरात जाणे टाळावे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रांमध्ये पाण्याच्या प्रवाहाजवळ जाण्याचे टाळावे.आपत्कालीन परिस्थितीत स्थानिक पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय किंवा जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. जिल्हा नियंत्रण कक्षाचा टोल-फ्री क्रमांक १०७७ असून दूरध्वनी क्रमांक ०२४१-२३२३८४४ व २३५६९४० उपलब्ध आहेत, असे आवाहनही करण्यात आले आहे.

जिल्हा मध्यवर्ती बँकेची ४२ वी सर्वसाधारण सभा उत्साहात

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्हा बँकेची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १४ सप्टेंबर रोजी उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यंदाच्या वर्षी बँकेने रु. २.०७ कोटींचा नफा नोंदवला असून, पुढील काळात बैंक सातत्याने नफ्यात राहील आणि विक्रमी वाढ साधेल, असा विश्वास बँकेच्या संचालक मंडळाने व्यक्त केला.

बँकेने ग्राहकांसाठी कोअर बँकींग सोल्यूशन संगणकीय प्रणाली उपलब्ध करून दिली असून, ठेवी, अनुदान, कर्ज व इतर निधीचा उपयोग जिल्ह्यातील शेतकरी सभासदांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात येत असल्याचे अध्यक्षांनी सांगितले. त्यांनी ठेवीदार, खातेदार व कर्जदार सभासदांना जिल्हा बँकेमार्फत व्यवहार करण्याचे, कर्जाची नियमित परतफेड करून व्याज परताव्याचा लाभ घेण्याचे आणि

केवायसी तसेच भागधारणेची पूर्तता करण्याचे आवाहन केले. सभेला मार्गदर्शन करताना माजी केंद्रीय रेल्वेराज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी बँकेच्या आर्थिक प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले. मोठ्या आर्थिक अडचणीतून बैंक सावरून स्वयंपूर्ण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. सहकारी संस्थांनी कर्जवसुलीस प्राधान्य दिल्यास बैंक कर्जवाटपात वाढ करू शकेल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच केंद्र शासन सहकारी संस्थांना बळकटी देण्यासाठी राबवत असलेल्या विविध योजनांची माहिती दिली.

सभेला बँकेचे उपाध्यक्ष भिमराव जावळे, संचालक मंडळाचे सदस्य संतोष दानवे, माजी आमदार अरविंदराव चव्हाण, कैलाश गोरंट्याल, शिवाजीराव चोथे, तसेच शालिकग्राम म्हस्के, भाऊसाहेब जाधव, रितेश कामड, स. जहीर, शितल कुचे, मनिषा उढाण, निर्मला मरकड, सुनिता खरात आदी मान्यवर उपस्थित होते. जिल्हा उपनिबंधक व सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था) हेही सभेस उपस्थित होते. बँकेचे कार्यकारी संचालक आशुतोष देशमुख, सरव्यवस्थापक सुरेश जाधव, व्यवस्थापक दादाराव राऊत यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वागत व सूत्रसंचालन सख्यवस्थापक सुरेश जाधव यांनी केले. सभेला माजी अध्यक्ष मनोज मरकड, माजी संचालक अशोक लोंढे, रावसाहेब दाभाडे, प्रदिपराव मरकड, सिध्दीविनायक मुळे, शकुंतलाताई कदम तसेच सहकारी, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली. सभेच्या अखेरीस कार्यकारी संचालक आशुतोष देशमुख यांनी सर्व सभासदांचे आभार मानले आणि अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

नेवासे तालुक्यात धो-धो पाऊस; शेतकऱ्यांचे नुकसान, कांदा उत्पादकांची धावपळ

सोनई। प्रतिनिधी

दहा दिवसांच्या विश्रांतीनंतर शनिवार रात्री नेवासे तालुक्यातील सर्व मंडलात सलग आठ तास धो-धो पाऊस झाला. या पावसामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांची धावपळ उडाली. यंदाच्या पावसाळ्यात प्रथमच अनेक गावांतील ओढे-नाले वाहते झाल्याने गाव आणि वाड्या-वस्त्यांचे रस्ते काही तास वाहतुकीस बंद होते. कुकाणे मंडलात सर्वाधिक, तर सर्वांत कमी पाऊस चांदे मंडलात झाला.

पावसाचे कुठलेही वातावरण नसताना रात्री आठ वाजता तालुक्यातील काही गावांमध्ये पावसाला सुरवात झाली. रात्री दहानंतर दोन तास जोरदार पाऊस झाला. नेवासे शहर व परिसरातील खुपटी, चिंचबन, निंभारी, भानसहिवरे येथे जोरदार पाऊस झाला. मोंढ्याला गोण्या भरायच्या म्हणून अनेक शेतकऱ्यांनी चाळीतून कांदा काढला होता. मात्र अचानक पावसाची संततधार सुरु झाली, तर काही गावांत वादळी वारे आल्याने कांदा भिजला. मुळाथडीतील पानेगाव, करजगाव, अंमळनेर, खेडलेपरमानंद व शिरेगाव भागात पहाटेपर्यंत पावसाची संततधार सुरू होती. शेत, कालवा व रस्ते चिखल व दलदल झाली आहे.

आष्टी तालुक्यात ढगफुटी : एनडीएचे पथक पाचारण

कडी नदीने धोक्याची पातळी ओलांडली, देवळाली, दौलावडगाव, घाटापिंपरी, दादेगाव, धामणगाव, कडा, पिंपरखेड, सुलेमान देवळा, डोंगरगण परिसर प्रभावीत, ५१ जणांची सुटका, एकाचा मृत्यू

आष्टी/म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात रात्री झालेल्या ढगफुटीसदृश्य पावसामुळे अनेक गावात हाहाकार उडाला आहे . देवळाली दौलावडगाव घाटा पिंपरी दादेगांव धामणगांव कडा पिंपरखेड सुलेमान देवळा डोंगरगण यासह परिसरातील अनेक गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झालीय.१० ते १५ ठिकाणी लोक अडकले असून त्यांना सुखरुप काढण्याचे तहसिलदार वैशाली पाटील,तलाठी,मंडळ अधिकारी, पोलिस प्रशासन प्रयत्न करत असून घाटापिंपरीत ५ ते ६ घरात अडकलेल्या लोकांना सुखरुप काढण्यात आले परंत १ जणाचा मृत्यू झाला आहे.कडा येथील कडी नदी ने धोक्याची पातळी ओलांडली असून एक ते दोन किलोमीटर पात्र सोडून पाणी शेतात,घरात घुसले असल्याने जनजिवन विस्कळित झाले आहे.कडा येथील पुलावरून पाणी वाहत आहे.अडकलेल्या नागरीकांना काढण्यासाठी एसडीआरएफरच्या टीमला नागरीकांना रेस्कू करण्यासाठी हेलिकॉप्टर पाचारण केले आहे.१५ ठिकाणी अधीक लोकं अडकल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. या ढगफुटीमुळे पशुधनाचंही नुकसान झाले.नागरीक अडकले आहेत.अडकलेल्या नागरीकांनी तहसिल आपत्ती विभागाला माहिती कळवावी व काळजी घ्यावी असे आवाहन तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले आहे.

आष्टी तालुक्यातील दौलावडगांव धामणगांव धानोरा या जिल्हा परिषद गटातील गावांना काल रात्री ढगफुटी सदृश्य झालेल्या पावसाने अतिवृष्टीचा तडाखा बसला आहे.ढगफुटीसारखा पाऊस आणि कडी नदीचे पाणी पातळी सोडून एक ते दोन किलोमीटर शेतात व घरात पाणी गावात पाणी शिरले. पावसाचा अलर्ट असल्याने परिस्थिती गंभीर झाली असल्याने महसूल, पोलिस प्रशासन अलर्ट अडकलेल्या नागरीकांना काढण्यासाठी एनडीआर एफ व हेलिकॉप्टर पाचारण करण्यात आले आहे. पावसाने आष्टी तालुक्याला झोडपून काढले आहे. पण त्याचा सर्वाधिक फटका देवळाली दौलावडगाव घाट पिंपरी दादेगाव धामणगाव कडा पिंपरखेड डोंगरगण या भागात तब्बल ९६ मिली मिटर पावसाची नोंद झाली आहे. हा पाऊस म्हणजे ढगफुटी म्हटले जाते. यापावसाने संपूर्ण परिसरात हाहाकार माजला अजून फटका बसला इथं मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. काही ठिकाणी एनडीआर एफ टीमच्या मदतीने बचावकार्य सुरू आहे.तर काही ठिकाणी हेलिकॉप्टर देखील पाचारण करण्यात आले असल्याची माहिती तहसिलदार वैशाली पाटील यांनी दिली आहे.

आ.सुरेश धस ठरले डिझास्टर मॅनेजर

लोकनेते आमदार सुरेश धस हेच आष्टी तालुक्यातील जनतेसाठी डिझास्टर मॅनेजर ठरलेले आहेत त्यांनी तात्काळ जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा प्रशासनाशी संपर्क करून एनडीआरएफ यंत्रणेला ला पाचारण करून हेलिकॉप्टर ची व्यवस्था करून या नैसर्गिक आपत्तीमध्ये अडकून पडलेल्या नागरिकांना जीवदान देऊन मोठा दिलासा दिला आहे युवा नेते जयदत्त यांनी पहाटेच तहसीलदार वैशाली पाटील आणि तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांचेशी संपर्क करून डोंगरगण भागामध्ये शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन या ढगफुटीची पाहणी केली होती त्याचवेळी आमदार सुरेश धस सकाळी सात वाजल्यापासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पालकमंत्री अजित दादा पवार बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन अहिल्यानगर जिल्हाधिकारी पंकज आशिया भारतीय लष्कर राष्ट्रीय आपत्ती निवारण दल एनडीआरएफ नाशिक यांच्या संपर्कात राहिल्यामुळे अखेर हेलिकॉप्टर द्वारे कडा, टाकळी अमिया, शेरी बु. येथील नदीच्या पाण्यामध्ये घरामध्ये व शेतामध्ये अडकलेल्या नागरिकांना सुखरूप योग्य स्थळी पोहचवले आहे युवा नेते जयदत्त धस सकाळी सात वाजल्यापासून कडा डोंगरगण दौलवडगाव, धामणगाव जिल्हा परिषद गटात घाटा, पिंप्री,केळ,हरेवाडी, देऊळगाव घाट,शेडाळा,वेलतुरी, गंगादेवी,सावरगाव मायंबा,डोंगरगण या गावांना भेटी देऊन झालेल्या अतिवृष्टीची व झालेल्या नुकसानीची पाहणी करत आहेत, सागर धस हे देखील कडा व परिसरामध्ये झालेल्या अतिवृष्टी व पाण्यामध्ये अडकलेल्या नागरिकांना मदत करण्यासाठी सहकार्य करत आहेत.

मा.आ.भिमराव धोंडेंकडून घटनास्थळी पाहणी

मागील २४ तासांपासून आष्टी, पाटोदा व शिरूर कासार तालुक्यातील विविध महसूल मंडळांमध्ये ढगफुटीसह अतिवृष्टी झाल्याने पाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी नागरिक अडकले असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.ही गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन आष्टी-पाटोदा-शिरूर कासार मतदारसंघाचे मा. आ. भीमरावजी धोंडे यांनी तातडीने जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांच्याशी संपर्क साधला आहे. अडकलेल्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि मदतकार्यासाठी हेलिकॉप्टरची तातडीने व्यवस्था करावी, असे त्यांनी मागणी केली आहे.

इंडियन आर्मीने यांची केली सुटका

टाकळी अमिया येथील शिवाजी दगडू महानवर, शकुंतला शिवाजी महानवर, साईनाथ नवनाथ महानवर, पारूबाई दगडू महानवर, शुभांगी नवनाथ महानवर **कडा येथील** गोविंद सापते, योगेश सापते, असराबाई सापते, मीनाबाई सापते, सुषमा सापते, आर्या सापते ,काजल सापते, कृष्णा ससे, अमोल बेदरे, आकाश बेदरे, सुमन बेदरे **शेरी खुर्द** येथील महेश ढोबळे पाटील, विजय ढोबळे, प्रिती महेश ढोबळे, सुर्वणा विजय ढोबळे, राजदीप विजय ढोबळे, गायबाई रामदास ढोबळे या सर्व नागरिकांना इंडियन आर्मी नाशिक यांच्या माध्यमातून रेस्क्यू करून रुग्णालयामध्ये तपासणी करता दाखल करण्यात आला आहे.

धामणगाव परिसरात प्रेत सापडले

आष्टी तालुक्यातील धामणगाव येथील आज दिनांक १५सप्टेंबर रोजी दुपारी सुमारास ०२:०० वा. मौजे धामणगाव परिसरात मुसळधार पावसामुळे नदीला आलेल्या पुरात एक ३० वर्षीय तरुण वाहून गेल्याची माहिती अंभोरा पोलीस स्टेशनला मिळाली. माहिती मिळताच अंभोरा पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. गावकऱ्यांच्या मदतीने नदी परिसरात शोधमोहीम सुरू करण्यात आली. अत्यंत चिखल, दलदल व धोकादायक परिस्थितीत शोधकार्य सुरू असताना,दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर नदीच्या काठाशी नमूद तरुणाचा मृतदेह मिळून आला. या घटनेत अंभोरा पोलीस स्टेशनच्या तत्पर कारवाईमुळे कमी वेळेत शोध कार्य यशस्वीरीत्या पूर्ण झाले. सदर घटनेचा पंचनामा करण्यात आला असून पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे.सदरची कारवाई अंभोरा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी मंगेश साळवे, पोह/ लुईस पवार, पोशिं / शिवदास केदार, पोशिं / सतीश पैठणे यांनी पार पाडली.

गंगामसला मंडळात अतिवृष्टी,पिकांचे मोठे नुकसान

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील गंगामसला मंडळात गेल्या चार दिवसापासून सुरु असलेल्या मुसळधार पावसाने व गोदावरी नदीला पूर आल्याने गंगामसला,सुरूमगांव,आडोळा,सांडस चिंचोली,गावात पुराचे पाणी शिरले आहे.अतिवृष्टीने गंगामसला मंडळातील गंगामसला, मोठेवाडी,छोटेवाडी,सुरूमगांव, गुंजथडी,सोन्नाथडी,रोषणपुरी, सोमठाणा,आडोळा, सरवर पिपळगाव,सांडस चिंचोली,पवारवाडी,घळाटवाडी, कल्याणनगर,शिंपेटाकळी या

शिवारातील कापुस, तुर,सोयाबीन पिके पाण्याखाली गेली असुन शेतीचेही मोठे नुकसान झाले आहे, तसेच सुरूमगांव, सांडस चिंचोली गावच्या ये- जा करणाऱ्या रस्त्यावर पाणी आल्याने या दोन गावांचा संपर्क तुटला आहे. नदीकाठच्या गावांमध्ये पाणी शिरल्याने येथील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असल्याचे सरपंच शिवकुमार माने यांनी सांगितले.

तहसीलदार संतोष रूईकर व तालुका कृषी अधिकारी गणेश बादाडे यांनी गंगामसला येथे बांधावर जाऊन अतिवृष्टीने झालेल्या पिक नुकसानीची पाहणी करून तलाठी, कृषीसहायक यांना बांधावर जाऊन पंचनामे करण्याचे आदेश दिले असल्याचे समजते. त्या नुसार मंडळ अधिकारी,तलाठी, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक,महसूल सेवक हे बांधावर जाऊन पंचनामे करत आहेत.ढग फुटी सदृश पावसाने पिके पाण्याखाली जाऊन मोठे नुकसान झाले आहे.नुकसानीचे पंचनामे करून सरसकट एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी असी मागणी गंगामसला मंडळातील शेतकऱ्यांनी केली आहे.

माजलगाव धरणाचा सिंदफणा नदीपात्रात ७१ हजार २४८ क्युसेकने विसर्ग

माजलगांव धरणातनाच्या पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टी व ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने धरणात येणारी पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात असल्याने धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्याच्या दृष्टीने माजलगाव धरणातुन दि १५ सप्टेंबर सोमवार रोजी सायंकाळी ५:०० वाजण्याच्या सुमारास धरणातुन द्वार क्रमांक ११,६,१६,१०, ९,१३,८,१२,१४ हे दिड मिटर व द्वार क्रं १५ हे २ मिटरने उघडण्यात आले आहे.यामधून सिंदफणा नदीपात्रात ७१ हजार २४८.९३ क्युसेसने इतके पाणी सोडण्यात आले.त्यामुळे माजलगाव तालुक्यातील ३२ गावांना पुर परीस्थीतीचा धोका निर्माण झाला आहे.

माजलगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टी व ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने त्यामुळे पाणलोट क्षेत्रातील कुंडलीका व सिंदफाना नदी-नाल्यामधुन माजलगाव धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे. परिणामी धरणातील पाण्याच्या पातळीत वाढ होत असून,दि १५ सप्टेंबर सोमवार रोजी सकाळी ५:०० धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील चालु आवक लक्षता घेता धरणाच्या जलप्रचलन आराखड्यानुसार जलपातळीचे नियमन करणे आवश्यक असल्यामुळे माजलगांव धरणातून द्वार क्रमांक ११,६,१६,१०, ९,१३,८,१२,१४ हे दिड मिटर व द्वार क्रं १५ हे २ मिटरने उघडण्यात आले आले असुन धरणातुन सिंधफाना नदीपात्रात ७१ हजार २४८.९३ क्युसेकने विसर्ग सोडण्यात आला आहे.त्यामुळे माजलगाव तालुक्यातील ३२ गावांत पुरस्थिती निर्माण झाल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.त्याअनुषंगाने माजलगांव तालुक्यातील सर्व गोदावरी/सिंदफणा नदीकाठच्या गावातील लोकांना प्रशासनाच्या वतीने अतिदक्षतेचा इशाही देण्यात आला आहे.

पिकांचे पंचनामा करा : भाई थावरे

जिल्ह्यात दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे सर्व नद्यांना पुर आला असून शेतात पाणी साचले आहे. या परिस्थितीमुळे उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पीक विमा कंपनीने तात्काळ शेतात जाऊन पंचनामा करावा व योग्य मोबदला द्यावा, अशी मागणी शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी केली आहे.

नुकसानग्रस्त भागाची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

बीड । प्रतिनिधी

मुसळधार पावसामुळे बीड शहर आणि परिसर पाण्यात बुडाला . शहरातील सर्वात मोठ्या लेंडी नाल्याला १९८९ सालाप्रमाणे महापुर आला. अचानक वाढलेल्या पुराच्या पाण्याने अनेक घरांत पाणी शिरले. त्यामुळे घरातील साहित्य, पत्रे, जनावरे , गाड्या, हातगाड्या वाहून गेल्या. अनेक नागरिकांनी घराबाहेर पडून आपले प्राण वाचवले. या संकटाच्या वेळी माजी सभापती खुर्शीद आलम यांनी आपल्या सहकाऱ्यांसह नागरिकांना पाण्यातून बाहेर काढून सुरक्षित स्थळी पोहोचवले. स्थानिक नागरिकांनीही एकमेकांना मदत करून मोठी जीवितहानी होण्यापासून बचाव केला. यानंतर सकाळी खुर्शीद आलम यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव, बीडचे मुख्याधिकारी शैलेश फडसे, नायब

तहसीलदार सुहास हजारे यांना फोन करून परिस्थितीची माहिती दिली व तातडीने पाहणी करण्याची विनंती केली. त्यानुसार जिल्हाधिकारी स्वतः मोमीनपुरा भागात येऊन नुकसानग्रस्त भागांची पाहणी केली. त्यांनी नागरिकांना दिलासा देत जिल्हा प्रशासन त्यांच्या सोबत असल्याचे सांगितले. तसेच नुकसानग्रस्तांची माहिती घेऊन नाल्याची सफासफाई करण्याचे आदेश संबंधित ◀◀ पान २ वर

आज जिल्ह्यातील शाळांना सुट्टी!

बीड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे बहुतांश तालुक्यात अतिवृष्टीची नोंद झाली आहे अनेक नद्या नाल्यांना महापूर आल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे त्यामुळे हवामान विभागाच्या अंदाजानुसार पावसाचा जोर कायम राहणार असल्याने बीड जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्ह्यातील सर्व खाजगी आणि सरकारी शाळा अंगणवाडी आश्रम शाळा महाविद्यालय यांना मंगळवारी सुट्टी जाहीर करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांनी म्हटले आहे.बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात गेल्या दोन-तीन दिवसापासून मोठ्या प्रमाणात मुसळधार पाऊस कोसळत आहेत जिल्ह्यातील १६ मध्यम आणि १२६ लघु प्रकल्प वसंतून वाहत असल्यामुळे शिरूर पाटोदा आष्टी बीड वडवणी गेवराई अंबाजोगाई परळी या तालुक्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. गोदावरी नदीपात्रामध्ये एक लाख दिवसात पेक्षा अधिकच पाणी विसर्ग करण्यात येत आहे तसेच वडवणीच्या उर्दू कुंडलिका माजलगाव मांजरा या धरणातून देखील गेटमधून हजारो की सेक्स पाणी नदीपात्रात सोडण्यात येत असल्यामुळे अनेक गावात पूरस्थिती निर्माण झाली आहे.बीड सह महाराष्ट्रात पुढचे काही दिवस पावसाचे संततदार सुरूच राहण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे या पार्श्वभूमीवर बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी मंगळवारी जिल्ह्यातील सर्व शाळा महाविद्यालय आश्रम शाळा अंगणवाडी यांना सुट्टी दिली आहे.

नागरिकांनी सतर्क राहण्याचे धनंजय मुंडे यांचे आवाहन

परळी । प्रतिनिधी

परळी - अंबाजोगाई तालुक्यांसह बीड जिल्ह्यात सर्वदूर सातत्याने जोरदार पाऊस सुरू असून, मागील २४ तासात अनेक महसुली मंडळांमध्ये पावसाने अतिवृष्टीची नोंद झाली आहे व त्यापुढेही सतत पाऊस सुरूच आहे. अनेक मोठ्या प्रकल्पांचे दरवाजे उघडल्याने बीड जिल्ह्यात प्रवाह असलेल्या अनेक नद्यांना पूर आला असून, लहान - मोठे सर्वच प्रकल्प भरून नद्या दुथडी भरून वाहत आहेत, अनेक गावांचा संपर्क तुटला असून, अनेक ठिकाणी पुलावरून पाणी वाहत असून, बरेच रस्ते बंद देखील ◀◀ पान २ वर

नोंदणी क्र.ए-९६२ (बीड)

श्री खंडेश्वरी देवी संस्थान, ट्रस्ट बीड

अध्यक्ष
श्री. अभिजीत (राणा) रणजितसिंह चौव्हाण
(9422242750/9303949494)

जा.क्र. ०७/२०२५ दिनांक : १५/०९/२०१५

श्री. खंडेश्वरी देवी नवरात्र महोत्सव सन २०२५-२६

दिनांक २२.०९.२०२५ ते दि.०२.१०.२०२५ या कालावधीत श्री. खंडेश्वरी नवरात्र महोत्सवानिमित्त स्टॉल धारकांसाठी जागा वाटप कार्यक्रम खालीलप्रमाणे राहिल.

दि.१६.०९.२०२५ रोजी वार मंगळवार सकाळी ठिक ११-०० वाजता

फुलवाले, झेंडीवाले, पेढेवाले, कटलरी व ज्वेलरी इत्यादी.

दि. १७.०९.२०२५ रोजी वार बुधवार सकाळी ठिक ११-०० वाजता

आईस्क्रीम, वडापाव, पावभाजी, हॉटेल, पानटपरी, भोई इत्यादी व्यवसाईक.

टीप:

१) जागा वाटप त्याच दिवशी दिलेल्या वेळेतच होईल. जागेचा बांधकाम निधी घेऊन ताबा त्याचवेळी देण्यात येईल. जागा सर्व धर्मियासाठी वाटप होईल. यात्रेत गॅस वापरास बंदी करण्यात आली आहे. आपले रहिवाशी प्रमाणपत्राची / आधारकार्डची सत्यप्रत द्यावी लागेल.

२) श्री. खंडेश्वरी देवी संस्थान विश्वस्त मंडळाचा ठराव ०१ प्रमाणे आकाशवाणी टी पॉईंटपासून रोडची दोन्ही बाजू व श्री. खंडेश्वरी देवी मंदिर परिसरात छायाचित्रांकित डिजीटल बोर्ड जाहिरात लावण्यास मनाई केली असून जो या निर्णयाचे उल्लंघन करील अशा व्यक्तीविरुध्द? कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

३) तसेच ज्या भाविक भक्तांना नवरात्र महोत्सवात देवीची महाआरती रात्री. ०८:३० वा करावयाची असेल त्यांनी अगावू सुचना ०४ दिवस अगोदर मंदिराच्या कार्यालयात नोंद करावी किंवा श्री. खंडेश्वरी देवी संस्थान ट्रस्टचे कोषाध्यक्ष श्री. राजेंद्रजी बन्सोडे यांच्याशी संपर्क करावा. (संपर्क क्रं. ९४२२२४०१५५)

स्वाक्षरित/- स्वाक्षरित/-
अध्यक्ष सचिव
श्री.खंडेश्वरी देवी संस्थान ट्रस्ट, बीड

सरसकट नुकसान भरपाई द्यावी - आ.क्षीरसागर

बीड : बीड जिल्हासह शहर आणि तालुक्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने शेतकऱ्यांचे आणि ग्रामस्थांचे नुकसान झाल्याने शासनाने नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून सरसकट नुकसाभरपाई देण्याची मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. बीड शहर व तालुक्यासह संपूर्ण जिल्हात मोठ्या प्रमाणावर काल रात्रीपासून मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्यामुळे बिंदुसरा तसेच इतर छोटे-मोठे तलाव,नदी,ओढे तुडुंब भरले असून पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. काल रात्री झालेल्या पावसाने पीक, पशुहानी, शेतकरी बांधव व ग्रामस्थांचे मोठे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री मा.ना.अजित दादा पवार तसेच बीडच्या जिल्हाधिकारी यांना बीड विधानसभेचे आ.संदीप क्षीरसागर यांनी पत्र देऊन केली आहे.

दिंद्रुडच्या सरस्वती नदीला पूर

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील मोहखेड परिसरातील व्हारकटवाडी, शिंगणवाडी, सुरनरवाडी आदि खेडेगाव असलेल्या डोंगराळ भागात ढगफुटी सदृश पाऊस झाला. त्यामुळे डोंगराळ भागातून येणाऱ्या दिंद्रुडच्या सरस्वती नदीला पूर आला असून, येथील बंधारे तुडुंब भरून वाहत आहेत.फकीर जवळा , देवदहिफळ परिसरात मुसळधार पावसामुळे सोयाबीन, कापूस इतर पिकांचे नुकसान झाले आहे, माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड, पिंपळगाव, बेलुरा ,देवळा, उमरी आदि गावातून वाहणाऱ्या सरस्वती नदीला पूर आल्यामुळे विहीर, बोर ची पाणी पातळीत चांगल्या गतीने वाढ झाली असल्याचे शेतकरी बांधवांनी सांगितले. पुढे हि सरस्वती नदी मोगरा भागात गोदावरी नदीला मिळते. धारूर तालुक्यातील ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
मंगळवार, दि.१६ सप्टेंबर २०२५ । पान ७

डेंग्यू व मलेरियासारख्या संसर्गजन्य आजारांना आळा घालण्यासाठी महापालिकेची व्यापक मोहीम

घराघरांत तपासणी, औषध फवारणी व जनजागृतीवर दिला जातोय भर, ४० लाख ५८ हजार रुपयांचा दंड वसूल

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महापालिका डेंग्यू व मलेरियासारख्या संसर्गजन्य आजारांना आळा घालण्यासाठी सातत्याने कार्यरत असून, नागरिकांच्या आरोग्यरक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवत आहे. या मोहिमेअंतर्गत घराघरांत तपासणी, औषध फवारणी, जनजागृती उपक्रम तसेच कठोर दंडात्मक कारवाईला गती देण्यात आली आहे. याच अनुषंगाने १ जून २०२५ पासून आतापर्यंत सुमारे ४ हजार १३७ ठिकाणी नोटिसा बजावल्या असून, १ हजार १४२ जणांवर थेट दंडात्मक कारवाई करून ४० लाख ५८ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त सचिन पवार यांच्या अधिपत्याखाली महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून औषध फवारणी, घराघरांत तपासणी, बांधकामस्थळांवरील पाहणी, कंटेनर तपासणी तसेच जनजागृती कार्यक्रम व दंडात्मक कारवाई अशा बहुआयामी मोहिमांना गती देण्यात आली आहे. महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांतून समन्वय साधून याबाबतचा एकत्रित आराखडा तयार करण्यात आला आहे. या उपक्रमांमुळे डासांची उत्पत्ती कमी होत असून, संसर्गजन्य आजारांवर नियंत्रण मिळवण्यास मदत होत आहे.

तपासणी व कारवाईचा तपशील (आकडेवारी १ जून २०२५ पासून १४ सप्टेंबर २०२५ पर्यंतची)

घरांची तपासणी : ९ लाख ८० हजार ३८० घरांची पाहणी; त्यापैकी १४ हजार २७४ घरांच्या परिसरात डास उत्पत्तीची चिन्हे आढळली.

कंटेनर तपासणी : निवासी घरे,संस्था,आदी ठिकाणच्या विविध ५१ लाख ८४ हजार ९७२ कंटेनर (भांडी,ड्रम,कुंड्या,पाणी साठवणीची ठिकाणे आदी) तपासले गेले; त्यापैकी १५ हजार ४०७ ठिकाणी डास वाढीस पोषक वातावरण नोंदले गेले.

टायर पंक्चरची व भंगार दुकाने : २ हजार ११ भंगार दुकाने तपासून तातडीने सूचना व सुधारणा.

बांधकामस्थळे : २ हजार २१३ ठिकाणी पाहणी करून अस्वच्छता दूर करण्याची कारवाई.

नोटिसा व दंडात्मक कारवाई : ४ हजार १३७ ठिकाणी नोटिसा बजावल्या तर १ हजार १४२ नागरिक व आस्थापनांवर थेट दंडात्मक कारवाई करून ४० लाख ५८ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

जनजागृतीवर दिला जातोय भर

महापालिकेने फक्त कारवाईवरच भर न देता जनजागृती व स्वच्छता उपक्रम राबवण्यास देखील प्राधान्य दिले आहे. यामध्ये घराघरांत माहितीपत्रकांचे वितरण, शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आरोग्य व स्वच्छतेबाबत प्रशिक्षण, प्रभागस्तरीय विशेष कार्यक्रम, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहिमा व औषध फवारणीची सततची मोहीम असे विविध उपक्रम महापालिका राबवत आहे. याशिवाय आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा, घराच्या परिसरात पावसाचे पाणी साचू देऊ नका, घर व आजूबाजूच्या परिसरात स्वच्छता ठेवा, असे आवाहन नागरिकांना महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेने डेंग्यू व मलेरियासारख्या संसर्गजन्य आजारांवर आळा घालण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने उपाययोजना राबवल्या आहेत. औषध फवारणी, घराघरांत तपासणी, बांधकामस्थळांवरील पाहणी, कंटेनर तपासणी यांसोबतच नागरिकांसाठी जनजागृती मोहिमा राबवण्यात महापालिकेकडून प्राधान्य दिले जात आहे. या मोहिमांमुळे डासांची उत्पत्ती कमी होऊन संसर्गजन्य आजारांवर नियंत्रण मिळवण्यास मदत होत आहे. पुढील काळातही ही कारवाई अधिक काटेकोरपणे व नियोजनबद्ध राबवली जाईल.
– विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जात आहेत. मात्र नागरिकांचा सहभाग तेवढाच महत्त्वाचा आहे. आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळल्यास डेंग्यू व मलेरियाचा प्रादुर्भाव आटोक्यात येऊ शकतो.
– सचिन पवार, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

खडकवासला धरणातून पाणी सोडलं, भिडे पूल पाण्याखाली जाण्याची शक्यता, पुण्यातील शाळांना सुट्टी जाहीर

पुणे । प्रतिनिधी

पश्चिम राजस्थानातून मान्सूनने परतीचा प्रवास सुरू केला असून त्याचा प्रभाव महाराष्ट्रातही जाणवू लागला आहे. गेल्या दोन दिवसांपासून राज्यात परतीचा पाऊस सक्रिय झाला असून अनेक भागांत वादळी वाऱ्यांसह मुसळधार पाऊस सुरू आहे. हवामान विभागाने (खचऊ) रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांसह पुणे, साताऱ्याच्या घाटमाथ्यावर जोरदार पावसाचा अंदाज असल्याने ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

पुणे शहरात रविवारी दुपारपासून पावसाने दमदार हजेरी लावली असून, हडपसर, लोहगाव, कोथरूड, शिवाजीनगर, मगरपट्टा, हवेली आणि चिंचवड या भागांत पावसाच्या संततधार सरी पडत आहेत. चिंचवडमध्ये

सर्वाधिक ४० मिमी पावसाची नोंद झाली आहे. पावसाचा जोर इतका आहे की, रस्त्यांवर पाणी साचले, अनेक झाडे कोसळली आणि वाहतूक व्यवस्थेवर परिणाम झाला आहे. परिणामी पुण्यातील अनेक शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. हडपसर परिसरातील बहुतेक शाळांनी आज शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सततच्या पावसामुळे खडकवासला धरण (घहरवरज्ञुरीश्रर वरा) साखळीतील पाणीसाठा वाढला असून, सकाळी १० वाजल्यापासून मुठा नदीच्या पात्रात १४,५४७ क्युसेक्सने पाणी सोडण्यात येत आहे. यासोबतच वरसगाव आणि पानशेत धरणांतूनही विसर्ग सुरू आहे. त्यामुळे भिडे पुल पाण्याखाली जाण्याची शक्यता वर्तवली आहे. मुसळधार पावसाचा सर्वाधिक फटका पुणे जिल्ह्यातील सखल भागांना बसला आहे. थेऊरमध्ये ५० घरांमध्ये पाणी शिरल्याची माहिती आहे. एनडीआरएफच्या जवानांनी सुमारे ५० ते ६० नागरिकांची सुखरूप सुटका केली आहे. इंदापूर आणि धायरी येथेही पाणी घरात घुसल्यामुळे जनतेला सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. शिरूरसह इतर भागात पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक शेतात पाणी साचल्याने शेती तळ्यात रूपांतरित झाली आहे. नुकत्याच भरभरून आलेल्या पावसामुळे आठवड्याभरानंतर पुन्हा शेतकरी संकटात सापडले आहेत. इंदापूर तालुक्यातील काझड येथे जोड कालवा फुटल्यामुळे शेतात मोठ्या प्रमाणात पाणी गेलं आहे. बारामती परिसरातही रात्री पाऊस झाला होता.

पूजा खेडकरच्या बंगल्यात दोन तास झाडाझडती

पुणे । प्रतिनिधी

नवी मुंबईत घडलेल्या एका अपघातानंतर ट्रक हेल्परच्या अपहरणाने राज्यात खळबळ उडाली. या प्रकरणाचा धागा थेट बडतर्फ ख-ड अधिकारी पूजा खेडकरच्या (झेक्षर घहशवज्ञरी)कुटुंबाशी जोडला गेला आहे. अपहरण झालेला ट्रक हेल्पर प्रल्हाद कुमार पुण्यातील बाणेर येथील दिलीप खेडकर (ऊळश्रळ घहशवज्ञरी) यांच्या बंगल्यात आढळून आला. याप्रकरणी दिलीप खेडकर यांच्यावर अपहरणात थेट सहभागाचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, दिलीप खेडकर यांना पळून जाण्यास मदत केल्याचा आणि सरकारी कामात अडथळा आणल्याचा आरोप त्यांची पत्नी मनोरमा खेडकर (चरपेीरार घहशवज्ञरी) यांच्यावर ठेवण्यात आला असून, त्यांनी पोलिसांवर कुत्रे सोडल्याचंही पोलिसांनी नमूद केलं आहे. या पार्श्वभूमीवर चतुश्रृंगी पोलीस ठाण्यात मनोरमा खेडकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मनोरमा खेडकर यांचा ठावठिकाणा शोधण्यासाठी चतुश्रृंगी पोलिसांची टीम पुण्यातील खेडकरांच्या बंगल्यावर पोहोचली. पोलिसांनी बंगल्यातील कर्मचार्यांची सखोल चौकशी केली. मात्र, तपासासाठी आलेल्या पोलिसांना मनोरमा खेडकर या घरात आढळल्या नाहीत. त्या घरातून गायब असल्याचं समोर आलं आहे. पोलिसांनी सुमारे सव्वा दोन तास खेडकर यांच्या बंगल्यावर थांबून संपूर्ण परिसराची झडती घेतली.

दिलीप आणि मनोरमा खेडकर हे त्यांचे फोन पुण्यातील बंगल्यात ठेऊन गायब झाले आहेत.

रबाळे आणि पुण्यातील चतुश्रृंगी पोलिसांनी दोघांच्या मोबाईल लोकेशनचा शोध घेतला असता त्यांचं अखेरचं लोकेशन त्यांच्या बंगल्यातच आढळलं आहे. पोलिसांनी आतमध्ये जाऊन तपास केला असता दोघांच्या मोबाईलचे लोकेशन आढळणे बंद झाले. पोलिसांनी घरातून पूजा खेडकरचा एक जुना मोबाईल ताब्यात घेतलाय. मात्र, दिलीप आणि मनोरमा खेडकर यांचे मोबाईल मात्र सापडलेले नाहीत. दिलीप आणि मनोरमा खेडकर यांच्या रबाळे इथल्या अपघातातील ५००० क्रमांकाची लॅन्ड क्रुझर गाडी वगळता सर्व गाड्या बंगल्यातच आहेत. तर मनोरमा खेडकर या कॅबमधून पळाल्याचं पोलिसांचं म्हणणं आहे.

शनिवारी सायंकाळी सुमारे सव्वा सातच्या सुमारास मुलुंड-ऐरोली मार्गावर सिमेंट मिक्सर ट्रक आणि चक १२ ठझ ५००० क्रमांकाच्या लॅंड क्रूझर गाडीचा अपघात झाला. अपघातानंतर गाडीतून उतरलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी ट्रकचा हेल्पर प्रल्हाद कुमार याला जबरदस्तीने गाडीत बसवून नेले, असा आरोप करण्यात आला. यानंतर ट्रक चालकाने ही घटना तात्काळ मालक विलास ढेंगरे यांना कळवली आणि रबाळे पोलीस ठाण्यात अपहरणाची तक्रार दाखल करण्यात आली. तक्रार प्राप्त होताच पोलिसांनी संबंधित लॅंड क्रूझरचा शोध घेण्यास सुरुवात केली. तपासादरम्यान, चक १२ ठझ ५००० क्रमांकाची गाडी पुण्यातील बाणेर परिसरात एका बंगल्यासमोर उभी असल्याचे निदर्शनास आले. सदर बंगला बडतर्फ ख-ड अधिकारी पूजा खेडकर यांचे वडील दिलीप खेडकर यांच्या मालकीचा असल्याचे तपासात स्पष्ट झाले होते. या प्रकारांच्या चौकशीसाठी पोलीस खेडकर कुटुंबियांच्या बंगल्यावर गेले असता दिलीप खेडकर आणि मनोरमा खेडकर फरार झाल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांकडून दोघांचाही शोध घेतला जात आहे.

'ड्रंक अॅण्ड ड्राईव्ह' कराल, तर आता झाडंही लावावी लागतील ; जुन्नर न्यायालयाचा पर्यावरणपूरक निर्णय

ओझर । प्रतिनिधी

जुन्नर येथे दि. १३ सप्टेंबर रोजी पार पडलेल्या राष्ट्रीय लोक न्यायालयामध्ये ड्रंक अँड ड्राईव्ह केसेस मधील आरोपींना आर्थिक दंडासोबतच प्रत्येकी दोन वृक्ष लावण्याचा आदेश देण्यात आला.या राष्ट्रीय लोक न्यायालयामध्ये जिल्हा न्यायाधीश श्रीमती नायर यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर हुसेन, सह दिवाणी न्यायाधीश अनंत बाजड, श्रीमती स्वप्ना घुले व श्रीमती श्रेया जैन यांनी पॅनल जज म्हणून काम पाहिले.

यामध्ये अनंत बाजड यांनी नवीन संकल्पना राबवत मोटार वाहन कायद्याचे कलम १८५ (ड्रंक अँड ड्राईव्ह) प्रमाणे शिक्षा पात्र गुन्ह्यामध्ये शिक्षे बाबतचा सौदा (प्ली बारगेनिंग) चा वापर करून सदर गुन्ह्यामध्ये (ड्रंक अँड ड्राईव्ह केसेस मधील) आरोपींना १० हजार/-रुपये दंड ऐवजी २ हजार ५०० रुपये दंड करून नारायणगाव पोलीस ठाणे २२ केसेस, ओतूर पोलीस ठाणे १५ केसेस, आळेफाटा पोलीस ठाणे १० केसेस व जुन्नर पोलीस ठाणे ३ केसेस असे एकूण ५० खटले निकाली काढून आरोपींकडून एकूण १ लाख २५ हजार रुपये आर्थिक दंड वसूल करण्यात आला आहे.

महत्वाचे म्हणजे यातील आरोपींना आर्थिक दंड करण्यासोबतच पर्यावरणाची सेवा म्हणून आरोपीने वनखात्याच्या परवानगीनुसार जुन्नर वन परीक्षेत्रामध्ये वड, पिंपळ, िंच च, कडुलींब, बेल, उंबर अस प्रत्येकी दोन वृक्ष लावण्याचा आदेश देखील देण्यात आला आहे. या पद्धतीने न्यायालयाच्या पर्यावरण कटीबद्धतेचाही प्रत्यय आला. याद्वारे लवकरच एकूण शंभर वृक्ष लावण्यात येणार आहेत.

पुण्यात सराफी दुकान फोडून तब्बल ८४ लाखांची चोरी

पुणे । प्रतिनिधी

खडक पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुरुवार पेठेतील माणिक ज्वेलर्स या दागिन्यांच्या दुकानात अज्ञात चोरट्यांनी चोरी करत तब्बल ८४ लाख ६० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना १४ सप्टेंबरच्या रात्री ते १५ सप्टेंबरच्या सकाळपर्यंत घडली.

फिर्यादी विनोद देवीचंद परमार (४१, रा. मुकुंदनगर, पुणे) हे चांदीचे होलसेल व्यापारी आहेत. त्यांच्या दुकानातील दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्यांनी प्रवेश करून चांदीचे दागिने, मूर्ती, रोख रक्कम आणि सीसीटीव्हीचा डीव्हीआर चोरला.

चोरट्यांनी लंपास केलेल्या मालामध्ये ४५ किलो चांदीचे पैंजण (किंमत अंदाजे ४० लाख रुपये), १५ किलो चांदीचे कडे, चैन, ब्रेसलेट व कॉईन (किंमत अंदाजे १३.५० लाख रुपये), १० किलो चांदीच्या देव मूर्ती (किंमत अंदाजे ९ लाख रुपये), रोख ५ लाख रुपये आणि १० हजार किमतीचा डीव्हीआर असा एकूण ८४ लाख ६० हजारांचा मुद्देमाल चोरला आहे. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी धावून आले. पोलीस उप आयुक्त संभाजी कदम, सहायक पोलीस आयुक्त अनुजा देशमाने यांच्यासह खडक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण व गुन्हे शाखेचे अधिकारी सकाळपासून तपासात गुंतले होते. सध्या अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे.

पावसामुळे पडलेली १० झाडे अग्निशमन विभागाने तात्काळ हटवली

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड शहरात १४ व १५ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या पावसामुळे १० ठिकाणी पडलेली झाडे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या जवानांनी हटवली. झाडे पडल्याची माहिती अग्निशमन विभागाला मिळाल्यानंतर जवानांनी घटनास्थळी धाव घेत ती हटवून वाहतूक सुरळीत केली आहे. यातील काही झाडे घरांवर/भिंतीवर पडून टेकली होती. ती झाडे जमिनीवर पूर्णपणे पडण्याच्या धोका संभवत असल्याने व त्यामुळे परिसरातून प्रवास करणाऱ्याच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने सदरील अर्धवट पडलेल्या झाडास पूर्णपणे बाजूला करण्यात आले.

शहरामध्ये १४ व १५ सप्टेंबर असे सलग दोन दिवस पावसाने हजेरी लावली आहे. या पावसामुळे शहरातील वेगवेगळ्या भागात झाडे, फांद्या पडल्या. याबाबतची माहिती अग्निशमन विभागाच्या मुख्य नियंत्रण कक्षाला मिळाली. त्यानंतर अग्निशमन विभागाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन तातडीने झाडे,

फांद्या हटविण्याचे काम सुरू केले. १४ व १५ सप्टेंबर (सायंकाळी ४ वाजेपर्यंत) या दोन दिवसांमध्ये अग्निशमन विभागाच्या वतीने १० ठिकाणांतील झाडे हटवून वाहतूक सुरळीत केली आहे, अशी माहिती अग्निशमन विभागातून देण्यात आली. तसेच अर्धवट पडलेल्या झाडापासून नागरिकांनी दूर म्हणजेच सुरक्षित अंतर बाळगावे, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने अग्निशमन विभागाच्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अग्निशमन विभागाचे महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक: पिंपरी मुख्य अग्निशमन केंद्र - ९९२२५०१४७५, भोसरी अग्निशमन केंद्र - ९९२२५०१४७६, प्राधिकरण अग्निशमन केंद्र - ९९२२५०१४७८, चिखली अग्निशमन केंद्र - ८६६९६९४१०१, थेरगाव अग्निशमन केंद्र - ७७३०९०७९९९, रहाटणी अग्निशमन केंद्र - ९९२२५०१४७८, मोशी अग्निशमन केंद्र - ७२६४९४३३३३ तळवडे अग्निशमन केंद्र - ९५५२५२३१०१, चोविसावाडी अग्निशमन केंद्र - ८४८४८०३१०१, नेहरूनगर अग्निशमन केंद्र - ८४८४०५११०१

२३ गावांसाठी मोठा निर्णय! आता बांधकाम परवाने महापालिकेच्या हातात ; अजित पवारांचे पीएमआरडीएला आदेश

पुणे । प्रतिनिधी

समाविष्ट २३ गावांतील बांधकाम परवाने देण्याचा अधिकार पुणे महापालिकेकडे देण्याचा आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (पीएमआरडीए) दिला. सध्या या गावांतील बांधकाम परवाने देण्याचा अधिकार पीएमआरडीएकडे आहे. यामुळे गावांमधील विकास कामे करण्यावर पालिकेला मर्यादा येत होत्या. विकासकामांबाबत पालिका आणि पीएमआरडीए एकमेकांकडे जबाबदारी ढकलत होते. याचा अनुभव खुद्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आल्यावर त्यांनी वरील आदेश दिला. यामुळे २३ गावांतील बांधकाम परवाने देण्याचे अधिक महापालिकेकडे आले आहेत.

महापालिकेच्या हद्दीत २३ गावे समाविष्ट करण्याचा निर्णय राज्य सरकारने ३० जून २०२१ रोजी घेतला. त्यानंतर काही दिवसांतच या गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (पीएमआरडीए) नियुक्ती करण्याचा आदेश राज्य सरकारने काढला. त्यामुळे गावांतील विकासाची सर्व जबाबदारी

विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून पीएमआरडीएवर आली. बांधकाम परवानगीचे अधिकारही प्राधिकरणाकडे आले. राज्य शासनाच्या निर्णयावर महापालिकेतील सत्ताधारी पक्षांनी नाराजी व्यक्त केली होती.

तसेच बांधकाम परवानगीचे अधिकार आणि विकास आराखड्याचे अधिकार देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली होती. मात्र तत्कालिन महाविकास आघाडी सरकारने याकडे दुर्लक्ष करत बांधकाम परवानगीचे अधिकार प्राधिकरणाकडेच ठेवले. त्यामुळे बांधकाम परवानगीतून मिळणारे शुल्क सुध्दा प्राधिकरणाकडे जमा होत होते. हे शुल्क मिळावे, जेणेकरून या गावांमध्ये विकास कामे करणे शक्य होईल, अशी भूमिका महापालिकेने घेतली होती.उपमुख्यमंत्री पवार यांनी रविवारी सकाळी मुंढवा-केशवनगर परिसरातील वाहतूक कोंडी होणाऱ्या भागाची पाहणी केली.

त्यावेळी पवार यांनी हा भाग कोणाकडे आहे, अशी विचारणा पालिकेचे आयुक्त नवलकिशोर राम यांच्याकडे केली. यावर पालिकेच्या अधिकाऱ्यांनी हा भाग पालिकेत आहे, मात्र बांधकाम परवानगीचे अधिकार हे पीएमआरडीएकडे आहे, असे सांगितले. यावर पवार यांनी प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांना फोन लावला. यावेळी पवार म्हणाले की, बांधकाम परवाने देण्याचे अधिकार प्राधिकरणाकडून महापालिकेला हस्तांतरित करा. येथे नागरिक राहतात. त्यांना ओपन स्पेस, गार्डन, आदी सुविधा मिळाल्या पाहिजेत. या सुविधा देण्याची गरज आहे. प्राधिकरण बांधकाम परवानगी देऊन बसतात.

बिल्डर बांधकाम करून जातो. त्यानंतर तुम्ही म्हणता, पालिकेने सर्व गोष्टी करायला पाहिजे. त्यामुळे बांधकाम परवाने देण्याचे अधिकार महापालिकेकडे द्या.तसेच प्राधिकरणाकडे बांधकाम परवानगी का ठेवली, असा सवाल पवार यांनी केला. पूर्वी चुक झाली असेल तर आता दुरुस्त करा. यासंदर्भात मी मुख्यमंत्री यांच्याशी बोलतो. ते प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत, असेही पवार यांनी यावेळी सांगितले.

दौंडज अटकेतील चोर अट्टल गुन्हेगार ; पन्नासहून अधिक गुन्हे दाखल असल्याचे

पुणे । प्रतिनिधी

पुरंदर तालुक्यातील दौंडज येथे दरोडा टाकून पोबारा करत असलेल्या तीन चोरांना जेजुरी पोलिसांनी पाठलाग करून पकडले होते. या चोरांकडे कसून तपास केला असता ५० हून अधिक गुन्हे असल्याचे निष्पन्न झाले. त्यांना सासवड येथील न्यायालयासमोर हजर केले असता सतरा तारखेपर्यंतची पोलीस कोठडी दिली आहे.शनिवारी दुपारी घरफोडी करून पलायन करत असलेल्या तीन चोरांना जेजुरी पोलिसांनी थोपटेवाडीच्या हद्दीत असलेल्या उसाच्या शेतामधून शिताफीने ताब्यात घेतले होते.

हत्यार बंद चोरांना शोधण्यासाठी पोलिसांनी ड्रोनचा देखील वापर केला होता. उसाच्या शेतामध्ये कोणत्या ठिकाणी हे चोर लपून बसलेले आहेत, याबाबत

ड्रोनच्या व्हिडिओमध्ये माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्यांचा पाठलाग करून पकडले. पोलीस आणि तरुणांचा घेरा पाहून या चोरांना पाळता भुई थोडी झाली. पोलिसांनी गचांडी धरून चोरांना ताब्यात घेतले. यामध्ये लखनसिंग रतपुतसिंग धुधानी (वय ३५), बेहतसिंग शामसिंग कल्याणी (वय ३०), दोघे रा. रामटेकडी, पुणे,रत्नेश राजकुमार पुरी (वय २३) रा. संभाजीनगर यांना ताब्यात घेतले होते.

याबाबत सहायक पोलिस निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, चोरांनी शनिवारी दौंडज आणि नीरा या दोन गावांत चोरी केली होती. दौंडज येथे चोरी करून जात असताना दौंडज मधील तरुणांनी त्यांचा पाटलाग केला. नीरा रेल्वे गेट बंद असल्याने ते लोकांच्या ताब्यात आले. मात्र लोकांना पिस्तूल दाखवून ते पळून गेले होते. पोलीस आणि तरुणांच्या प्रयत्नाने या सर्व चोरांना ताब्यात घेतले होते.

त्यांनी दोन ठिकाणी चोरी केल्याचे कबूल केले आहे. दोन्ही ठिकाणचा चोरीस गेलेला मुद्देमाल देखील ताब्यात घेण्यात यश आले आहे. गुन्ह्यात वापरलेले पिस्तूल देखील पोलिसांनी हस्तगत केले आहे. पोलिसांनी त्यांच्याकडे तपास केला असता त्यांच्यावर यापूर्वी ५० गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले. त्यांना सासवड न्यायालयात हजार केले असता चार दिवसाची पोलीस कोठडी दिली आहे.